
रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक २५८
www.ramprahar.com

शुक्रवार, ७ एप्रिल २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## ग्रामपंचायतींच्या रिक्त पदांसाठी १८ मे रोजी पोटनिवडणूक



**मुंबई** : राज्यातील विविध ग्रामपंचायतींमधील रिक्त पदांच्या पोटनिवडणुकीची घोषणा निवडणूक आयोगाकडून गुरुवारी (दि. ६) करण्यात आली. या पोटनिवडणुकीसाठी १८ मे रोजी मतदान होणार आहे. राज्यभरातील सुमारे दोन हजार ६२० ग्रामपंचायतींमधील रिक्त जागांसाठी पोटनिवडणूक होणार आहे. निधन, राजीनामा, सदस्यत्व रद्द झालेले अथवा अन्य कारणांमुळे रिक्त झालेल्या तीन हजार ६६६ सदस्य आणि १२६ थेट सरपंचांची याद्वारे निवड होईल. यासाठी उमेदवारी अर्ज २५ एप्रिल ते २ मे या कालावधीत दाखल करता येणार आहेत. अर्जांची छाननी ३ मे रोजी होईल. ८ मे दुपारी ३ ही अर्ज माघारीची अंतिम मुदत असून त्याच दिवशी निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात येईल. १८ मे रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान, तर मतमोजणी दुसऱ्या दिवशी म्हणजेच १९ मे रोजी होणार आहे.

### अंतरंग

‘आगामी निवडणुकांसाठी विजयाचा संकल्प करा’/२
जिते सरपंचासह असंख्य कार्यकर्ते भाजपमध्ये/५
रेवदंड्यात आमदार चषक क्रिकेट स्पर्धेचे उद्‌घाटन/८

# देश विकासाला भाजपचे प्राधान्य

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचे प्रतिपादन; पक्ष स्थापना दिन साजरा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

स्वतःच्या अस्तित्वाची लढाई लढणाऱ्या काँग्रेससारख्या पक्षांकडून आपल्याविरोधात कट-कारस्थाने चालूच राहतील, पण आपण देशवासीयांच्या स्वप्नांना, आकांक्षांना दबले जाताना पाहू शकत नाही. त्यामुळे भाजपचे प्राधान्य देशाच्या विकासावर व देशवासीयांच्या कल्याणाला आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी (दि. ६) केले.



भाजपच्या स्थापना दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशभरातील भाजप नेते, पदाधिकारी, कार्यकर्त्यांशी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून संवाद साधला. या वेळी त्यांनी काँग्रेसवर परखड शब्दांत टीका करताना ब्रिटिशांनी जाताना जनतेला गुलाम बनवण्याची मानसिकता यांच्या मनात सोडली, असे म्हटले.

काँग्रेस आणि इतर पक्षांची संस्कृती छोटा विचार करायचा, छोटी स्वप्ने बघायची आणि त्याहून छोटे यश मिळवून आनंद साजरा करायचा, एकमेकांची पाठ थोपटायची अशी आहे. भाजपची राजकीय संस्कृती मोठी स्वप्ने बघणे आणि त्याहून जास्त मिळवण्यासाठी जीवतोड मेहनत करणे ही आहे, असा टोला पंतप्रधान मोदींनी या वेळी लगावला.

स्वच्छ भारत अभियान, शौचालय देण्याची घोषणा मी केली, तेव्हा हेच लोक काय काय बोलायचे. जेव्हा आपली मस्करी करण्यात ते यशस्वी झाले नाहीत, तेव्हा बादशाही मानसिकतेच्या या लोकांचा द्वेष अजून वाढला. (पान २ वर..)

## भाजप जनसामान्यांचा पक्ष -उपमुख्यमंत्री फडणवीस



**मुंबई** : भाजप हा जनसामान्यांचा पक्ष आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे देवदुर्लभ नेतृत्व आपल्याला लाभल्यामुळे येत्या काळात आपल्याला अजून पुढे जायचे आहे, असे भाजप नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. भाजप स्थापना दिनानिमित्त मुंबईत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

आज भाजप देशातील सर्व भागांत जनतेचा पक्ष म्हणून काम करताना पाहायला मिळतोय. (पान २ वर..)

# गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी राज्य शासन प्रयत्नशील -ना. मंगलप्रभात लोढा

### शिवपुण्यतिथीनिमित्त किल्ले रायगडावर शिवप्रेमींचे अभिवादन



(छाया : महेश शिंदे)

**महाड : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३४३व्या पुण्यतिथीनिमित्त किल्ले रायगडावर गुरुवारी (दि. ६) हजारो शिवप्रेमींनी अभिवादन केले. श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ व स्थानिक उत्सव समिती महाड यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमास राज्याचे पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महिला व बालविकासमंत्री मंगलप्रभात लोढा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या वेळी त्यांनी किल्ले रायगडासह इतर गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी आणि परिसरातील शिवसृष्टीसारख्या प्रकल्पांसाठी शासन प्रयत्नशील असून निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही दिली.

या वेळी मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्यासमवेत भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार भरत गोगावले, माजी आमदार धैर्यशील पाटील, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाचे अध्यक्ष रघुजीराजे आंग्रे आदी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त किल्ले रायगडावर बुधवार आणि गुरुवार असे दोन दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पहिल्या दिवशी शिवसमाधी आणि जगदीश्वर मंदिर दीपवंदना, पुरस्कारप्राप्त मान्यवरांच्या मुलाखती (राजसभेत), शाहीर किरणसिंग सुरज राऊळ जळगाव यांचा ही रात्र शाहिरांची हा शाहिरी कार्यक्रम तसेच श्री जगदिश्वर मंदिरात हरिजागर असे कार्यक्रम झाले, तर दुसऱ्या दिवशी पहाटे श्री जगदिश्वर पूजा, श्री हनुमान जन्मोत्सव, त्यानंतर श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीची पूजा, राजदरबार येथे श्री शिवप्रतिमा पूजन करण्यात आले.

या वेळी मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे राज्य निर्माण केल्यामुळेच महाराजांची किर्ती जगभरात असल्याचे म्हटले. त्यांनी पुढे बोलताना अफजलखान वधाची प्रतिकृती प्रतापगडावर उभी केली जाणार असल्याचे सांगितले. (पान २ वर..)

### पुरस्कार, सन्मान अन् प्रकाशन

या कार्यक्रमाच्या निमित्ताने मराठ्यांच्या समाधीस्थळांचे अभ्यासक प्रवीण भोसले यांना श्री शिवपुण्यस्मृती रायगड पुरस्कार प्रदान करण्यात आला, तर सैन्यदल अधिकारी ले. जनरल सुदर्शन हसबनीस (निवृत्त), शूर सरदार हरजीराजे महाडीक यांचे वंशज यांचा विशेष सन्मान करण्यात आला आहे तसेच या वेळी शिवरायमुद्रा स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

# पनवेल मनपा मालमत्ता कराविरोधातील याचिका उच्च न्यायालयाने फेटाळली

### खारघर सोसायटीज फेडरेशनला दणका

**पनवेल : प्रतिनिधी**

खारघर कोपरेटिव्ह हौसिंग सोसायटीज फेडरेशन लि.च्या वतीने पनवेल महापालिकेच्या मालमत्ता कराविरोधात दाखल केलेली रिट पिटीशन गुरुवारी (दि. ६) उच्च न्यायालयात न्यायमूर्ती जी. एस. कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आर. एन. लड्डा यांच्या खंडपीठाने फेटाळली. ही याचिका कायद्यात किंवा तथ्यावर टिकू शकत नसल्याचे सांगत न्यायालयाने याचिकाकर्त्यांना चपराक लगावली आहे.

पनवेल महापालिकेची स्थापना १ ऑक्टोबर २०१६ रोजी झाली. त्यामध्ये पूर्वाश्रमीचे नगर परिषदेचे क्षेत्र तसेच नव्याने समाविष्ट झालेल्या २३ ग्रामपंचायती (२९ महसुली गावे) व सिडको अंतर्गत क्षेत्राचा समावेश करण्यात आला. महापालिकेच्या ११०.०६ चौकिमी क्षेत्रफळामध्ये नव्याने समाविष्ट झालेला अविकसित ग्रामीण भाग, महापालिकेची सद्याची आर्थिक स्थिती, आकृतीबंध मंजूर झाल्याने वेतनापोटी होणारा आस्थापना खर्च व विकासासाठी आवश्यक असणारा विकास निधी मालमत्ता करातून भागवण्यात येतो. त्यामुळे मालमत्ता कर हे महापालिकेचे एक मुख्य उत्पन्नाचे स्रोत असल्याने आयुक्त गणेश देशमुख यांनी कार्यभार स्वीकारल्यावर मालमत्ता कर आकारणी केली. इतर महापालिकांशी तुलना केल्यास पनवेल महापालिकेची कर आकारणी कमी आहे. पाच वर्षांची रक्कम एकदम भरावी लागत असल्याने ती रक्कम मोठी वाटते. (पान २ वर..)

# बामणडोंगरीत हनुमान जन्मोत्सव सोहळा

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते खेळाडूंचा सन्मान; मंदिरासाठी पाच लाखांची देणगी



**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यात हनुमान जन्मोत्सव गुरुवारी (दि. ६) मोठ्या उत्साहात साजरा झाला. यानिमित्ताने बामणडोंगरी येथील हनुमान मंदिरात जन्मोत्सव सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत हनुमानाचे मनोभावे दर्शन घेतले. या वेळी त्यांच्या हस्ते रायगडसह ठाणे जिल्ह्यात झालेल्या विविध क्रिकेट स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी करणाऱ्या बामणडोंगरीतील जीवदानी स्पोर्ट्स संघाच्या खेळाडूंचा सन्मान करण्यात आला.

बामणडोंगरीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करून हनुमान जन्मोत्सव साजरा झाला. या ठिकाणी जय हनुमान ग्रामस्थ मंडळ व हरिपाठ मंडळ यांच्या वतीने १ ते ५ एप्रिलदरम्यान भव्य ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आयोजित करण्यात आला होता तसेच गुरुवारी हनुमान जन्मोत्सव उत्साहात साजरा केला गेला. या सोहळ्याला लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत हनुमानाचे दर्शन घेतेले. या कार्यक्रमाचे औचित्य साधून त्यांनी बामणडोंगरीतील हनुमान मंदिरासाठी पाच लाख रुपयांची आर्थिक देणगी जाहीर केली.

देशातील सर्वांत मोठी केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील चषक ग्रामीण क्रिकेट स्पर्धा भिवंडीतील अंजुर येथे नुकतीच झाली. या स्पर्धेत बामणडोंगरीच्या जीवदानी स्पोर्ट्स संघाने चमकदार कामगिरी करीत विजेतेपद पटकाविले. (पान २ वर..)




## निवडक

### काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अँटनींच्या मुलाचा भाजपमध्ये प्रवेश

**तिरुवनंतपूरम** : काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी संरक्षणमंत्री ए. के. अँटनी यांचा मुलगा व केरळ काँग्रेसच्या सोशल मीडिया टीमचे माजी संयोजक अनिल अँटनी यांनी गुरुवारी (दि. ६) भाजपमध्ये प्रवेश केला. केंद्रीय मंत्री पीयूष गोयल, व्ही. मुरलीधरन, केरळ भाजप अध्यक्ष के. सुरेंद्रन यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश झाला.

### राज्यातील कोतवालांचे मानधन दुपटीने वाढले

**मुंबई** : राज्यातील कोतवालांच्या मानधनवाढीला वित्त विभागाची मान्यता मिळाली आहे. राज्यातील कोतवालांचे मानधन आता सात हजार ५००वरून १५ हजार होणार असल्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितले. हे मानधन १ एप्रिल २०२३पासून अनुज्ञेय असणार आहे. या निर्णयामुळे कोतवालांमध्ये आनंद व्यक्त होत असून त्यांनी सरकारचे आभार मानले आहेत.

## पनवेलमध्ये भाजप स्थापना दिन उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रथम राष्ट्र, नंतर संघटन आणि त्यानंतर स्वतः अशी देशहिताची विचारसरणी असलेल्या आणि त्यानुसार कार्यरत असलेल्या भारतीय जनता पक्षाचा स्थापना दिन गुरुवारी (दि. ६) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पनवेल भाजपच्या वतीने शहरातील मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळ सभागृह येथे झालेल्या कार्यक्रमात तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत व शहर अध्यक्ष जयंत पगडे यांच्या हस्ते पक्षाच्या ध्वजाचे रोहण करण्यात आले.

या वेळी भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सचिन पाटील, सरचिटणीस भूपेंद्र पाटील, ओबीसी सेलचे जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, माजी उपमहापौर चारुशीला घरत, सीता पाटील, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, (पान २ वर..)

# आगामी निवडणुकांसाठी विजयाचा संकल्प करा

## ■ भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे पक्ष कार्यकर्त्यांना आवाहन



**मुंबई : प्रतिनिधी**

पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत भाजप-शिवसेना युती मिळून सर्वच्या सर्व ४८ जागा जिंकण्याचा आणि विधानसभा निवडणुकीत २००पेक्षा अधिक जागा मिळवण्याचा संकल्प करा, असे आवाहन भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी (दि. ६) केले. भारतीय जनता पक्षाच्या स्थापना दिनानिमित्त प्रदेश कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

या कार्यक्रमास भाजपचे ज्येष्ठ नेते आणि उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल राम नाईक, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, कामगारमंत्री सुरेश खाडे, प्रदेश उपाध्यक्ष सुनील कर्जतकर, महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ, राज पुरोहित, कृपाशंकर सिंह, प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ, मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये आदी या वेळी उपस्थित होते.

बावनकुळे म्हणाले की, अत्यंत प्रतिकूल काळात हजारो कार्यकर्त्यांनी जनसंघ आणि त्यानंतर भाजपची विचारधारा रूजविण्यासाठी प्रयत्न केले. या कार्यकर्त्यांनी केलेल्या त्यागावरच आज पक्ष उभा आहे. भारतीय जनता पक्षाची स्थापना करताना माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी समृद्ध, विकसित, बलशाली भारताचे स्वप्न पाहिले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अटलजींनी पाहिलेले सर्वश्रेष्ठ भारताचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्याच्या दिशेने पावले टाकली आहेत. त्यामुळेच भारत हा जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असलेला देश बनला आहे.

या पुढील काळात राज्यात पक्ष वाढविण्यासाठी कार्यकर्त्यांनी पक्षाने दिलेल्या विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी करून मोदी सरकार आणि राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारची विकास कामे सर्वसामान्य माणसापर्यंत पोहचविली पाहिजेत. तीन कोटी नवे सदस्य बनविण्याचे अभियान यशस्वी करण्याचा आणि भाजप-शिवसेना युती मिळून लोकसभेच्या सर्व ४८ जागा, विधानसभेच्या २००पेक्षा अधिक जागा जिंकण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी स्थापना दिनाच्या निमित्ताने केला पाहिजे, असे बावनकुळे यांनी नमूद केले.

या वेळी त्यांच्या हस्ते जनसंघापासून काम केलेले राम नाईक, मुकुंद कुलकर्णी, मधू चव्हाण, कांता नलावडे, दिलीप गोडांबे, कर्नल चौधरी, कर्नल देशपांडे, अनंत मराठे, शैला पतंगे-सामंत, दिलीप हजारे, भरत कारंडे, श्रीपाद मुसळे, बाबा कुलकर्णी ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला.



# भाजप हे समृद्धीचे व विश्वासाचे नाव -उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस





## आमदार प्रसाद लाड यांच्या जनसंपर्क कार्यालयात पक्ष स्थापना दिन उत्साहात

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष व भाजपचे विधान परिषद प्रतोद आमदार प्रसाद लाड यांच्या मुंबई सायन सर्कल येथील जनसंपर्क कार्यालयात भाजपचा स्थापना दिन गुरुवारी (दि. ६) अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

राष्ट्र प्रथम, नंतर संघटन, शेवटी स्वतः, अशी कार्यकर्त्यांना शिकवण देणाऱ्या भाजपच्या स्थापना दिनाच्या निमित्ताने सायन सर्कल येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस खास उपस्थित होते. या वेळी त्यांच्या हस्ते भाजपचा ध्वज फडकविण्यात आला. भाजप हे नाव समृद्धीचे आणि विश्वासाचे असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी व्यक्त केले आहे. त्यांनी सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना पक्ष स्थापना दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास भाजप नेते पवन त्रिपाठी, जिल्हाध्यक्ष राजेश शिरवाडकर, माजी नगरसेविका राजेश्री शिरवाडकर, नेहल शाह यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून दोन रुग्णवाहिकांचे लोकार्पण करण्यात आले. आमदार प्रसाद लाड यांच्या पुढाकाराने सामाजिक क्षेत्रात विविध उपक्रम राबविले जातात. मी मुंबई अभियान अभिमान प्रतिष्ठान अंतर्गत सुरू असलेल्या चालता फिरता दवाखानाच्या ताफ्यात या रुग्णवाहिकांची भर पडणार असून या रुग्णवाहिका गरजू रुग्णांना अविरत सेवा देणार असल्याचे मत यावेळी आमदार प्रसाद लाड यांनी व्यक्त केले आहे.

# कोरोनाला घाबरू नका, पण काळजी घ्या! पनवेल महापालिकेचे नागरिकांना आवाहन

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात सध्या कोविड रुग्णांच्या संख्येत वाढ होत असल्याने पनवेल महानगरपालिकेमार्फत सर्व नागरिकांनी कोविड बूस्टर डोस लसीकरण करुन घ्यावे. नागरिकांना कोविड उपचार व निदानाची सोय महापालिकेच्या सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यामुळे घाबरु नका पण काळजी घेण्याचे आवाहन आयुक्त .गणेश देशमुख यांनी केले आहे.

पनवेलमध्ये गुरुवारी कोरोनाचे १३ नवे रुग्ण सापडल्याने एकूण रुग्ण संख्या ९३ झाली आहे. त्यामुळे नागरिकांनी गर्दीच्या आणि बंदिस्थ ठिकाणी विशेषतः सह व्याधी असणाऱ्या व्यक्ती आणि वृध्द यांनी जाणे टाळावे. तसेच डॉक्टर, पॅरामेडिक्स आणि रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांनी आरोग्य संस्थांमध्ये ,रुग्णालयात मास्क चा वापर करावा. गर्दीच्या आणि बंदिस्त ठिकाणी नागरिकांनी मास्क वापरावा. शिंकताना किंवा खोकताना नाक



आणि तोंड झाकण्यासाठी रुमाल वा टिश्यू वापरावा. नागरिकांनी हाताची स्वच्छता राखावी तसेच वारंवार हात धुवावेत. सार्वजनिक ठिकाणी थुंकु नये. श्वसनाच्या आजाराने ग्रस्त असलेल्यांनी वैयक्तिक संपर्क मर्यादित करावा अशा सूचना पालिकेच्यावतीने जाहीर करण्यात आल्या आहेत.

नागरिकांनी सर्दी, खोकला, ताप, अंगदुखी, घशामध्ये खवखवणे, श्वसनास त्रास होणे अशी लक्षणे आढळल्यास त्वरीत डॉक्टरांचा सल्ला घेऊन लवकर कोविड चाचणी करावी असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.नागरिकांनी सौम्य लक्षणे असल्यास स्वतः खात्री करून डॉक्टरांच्या सल्ल्यानेच औषधोपचार व कोविड चाचणी करावी. लक्षणे सौम्य असली तरी कोविडचा प्रसार इतरांना होऊ नये म्हणून कार्यालयात, शाळा, महाविद्यालये अशा ठिकाणी , गर्दीच्या ठिकाणी , सार्वजनिक ठिकाणी न जाता पूर्ण बरे होई पर्यंत स्वतः घरी अलगीकरणात राहावे आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानेच औषधोपचार व कोविड चाचणी करावी,असे आवाहन पालिकेचे मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी केले आहे.

## महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त गायनाचा कार्यक्रम

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी आधुनिक समाज निर्मितीमध्ये दिलेले अमूल्य योगदान, स्त्री शिक्षण, बहुजन शिक्षण व ज्ञाननिर्मितीसाठी केलेल्या महत्त्वाच्या कार्यांचा गौरव म्हणून त्यांच्या जयंतीनिमित्त महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था, (महाज्योती) नागपूर यांच्यामार्फत मुंबई विभागात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती इतर मागास बहुजन कल्याण, मुंबई विभागाच्या प्रादेशिक उपसंचालक, श्रीमती वंदना कोचुरे यांनी दिली.

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सामाजिक कार्याची नव्या पिढीला जाणीव व्हावी, त्यांचे समाजकार्य समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावे या उद्देशाने ११ एप्रिल,२०२३ रोजी कोकणभवन, नवी मुंबई येथे विभागीय स्तरावरील विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते विभागीय स्तरावरील संपन्न झालेल्या स्पर्धांच्या विजेत्यांना पारितोषिके वितरीत करण्यात येणार आहेत. तसेच सायंकाळी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारांवर आधारित गायनाचा कार्यक्रम होणार आहे.

## धरणा कॅम्प येथे महिलेचा मृतदेह

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील धरणा कॅम्प परिसरात एका महिलेचा मृतदेह आढळला असून तिच्या नातेवाईकांचा शोध तळोजा पोलीस करीत आहेत.

या महिलेचे अंदाजे वय ५० ते ५५ वर्षे असून रंग सावळा, अंगाने मध्यम, केस काळे, भुरकट, नाक सरळ, डोळे बंद, चेहरा उभट तसेच अंगात मेहदी रंगाचा शर्ट व मरून रंगाची हाफ पॅन्ट घातलेली आहे. सदर महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास तळोजा पोलीस ठाणे दूरध्वनी क्र. ०२२-२७४१२३३३ किंवा सपोनि सुनिल गुरव (मो.९४०३४४२०४२) यांच्याशी संपर्क साधावा.

# घरफोडी करणारे सराईत आरोपी जेरबंद

**पनवेल : वार्ताहर**

घरात कोणी नसताना घरातील सोने, हिरे व इतर मौल्यवान वस्तू आणि रोख रक्कम असा एकूण ९९ लाख ५५ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरी करून नेल्याची घटना वाशी सेक्टर ६ येथे घडली होती. याप्रकरणी वाशी पोलिसांनी सीसीटिव्ही फुटेज तसेच तांत्रीक तपासाद्वारे चार आरोपींना उत्तप्रदेश व मध्यप्रदेश येथून अटक केली आहे. सदर आरोपी हे सराईत गुन्हेगार असून त्यांच्यावर महाराष्ट्रासह गुजरात आणि राजस्थान राज्यात पन्नास पेक्षा अधिक घरफोडीचे गुन्हे दाखल आहेत.

वाशी पोलीस ठाणे हद्दीतील सेक्टर ६ मधील रो हाऊसमध्ये घरात कोणी नसताना कोणीतरी अज्ञात इसमाने ग्रिल तोडून घरातील सोने, हिरे व इतर मौल्यवान वस्तू आणि रोख रक्कम असा एकूण नव्यान्नव लाख पंच्यान्नव हजार रुपये किंमतीचा माल चोरी करून नेला. याबाबत वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होताच वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि प्रशांत तायडे, पोउपनि निलेश बारसे व गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलीस हवा श्रीकांत सावंत, पोहवा विनोद वारींगे,



पोहवा सुनिल चिकणे, पोना चंदन म्हसकर, पोना संदीप पाटील, पोना ठाकुर, पोना गोकुळ ठाकरे, पोना अमोल राठोड, पोशि किशोर डगळे, पोशि अमित खाडे आदींची ३ वेगवेगळी पथके तयार केली. या पथकांनी मिळालेले पुरावे, सीसीटिव्ही फुटेज तसेच तांत्रीक तपासाद्वारे आरोपी आशीष उर्फ सुरज जिलेदार सिंग (वय ३२, रा. उत्तरप्रदेश), राजकुमार लालबहादुर सिंग ठाकुर (वय ४२, रा. उत्तरप्रदेश), राजकुमार रामकुमार पांचाळ (वय ४३, रा.मध्यप्रदेश) आणि पुजा अंकुश जाधव (वय ३२, रा.मध्यप्रदेश) यांना उत्तरप्रदेश व मध्यप्रदेशमधून ताब्यात घेतले. त्यांच्याकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी सदर गुन्हा केल्याचे कबुल केले. त्यांचेकडून पोलिसांनी गुन्ह्यातील चोरलेल्या मालमत्तेपैकी १३ लाख ५० हजार ५०० रूपये रोख रक्कम, ८ लाख रूपयांचे अमेरीकन डॉलर्स, १ लाख १५ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने असे एकुण २२ लाख ६५ हजार रूपये किंमतीचा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे.

पान १ वरून

### देश विकासाला भाजपचे प्राधान्य

त्यांनी कधी विचारच केला नव्हता की, अनेक दशकांपासून हिंसेच्या समस्येने ग्रस्त जम्मू-काश्मीर आणि पूर्वेकडची राज्ये शांततेत राहतील. कलम ३७० कधी हटेल असे त्यांना वाटले नव्हते. भाजप जसे काम करतेय, ते यांना पचतच नाहीये. त्यामुळे या द्वेषातून ते आज खोट्यावर खोटे बोलत आहेत, अशा शब्दांत पंतप्रधान मोदींनी काँग्रेसवर आसूड ओढले.

भ्रष्टाचाराचा खुलासा होताना पाहून ते अस्वस्थ आणि हताश झाले आहेत. आता त्यांना एकच मार्ग दिसतोय. ते खुलेपणाने म्हणतायत की मोदी तेरी कबर खुदेगी. ते आता कबर खोदण्याची धमकी देतायत. बादशाही मानसिकतेच्या या लोकांना, पक्षांना एक गोष्ट माहिती नाहीये की, आज देशातील गरीब, सामान्य माणूस, युवक, महिला, दलित, पीडित, वंचित, आदिवासी असे सगळे भाजपचे कमळ फुलवण्यासाठी, त्याच्या संरक्षणासाठी ढाल बनून उभे राहिले आहेत, असेही पंतप्रधान मोदी यांनी विरोधकांना ठणकावून सांगितले.

### भाजप जनसामान्यांचा पक्ष -उपमुख्यमंत्री फडणवीस

ईशान्य भारतातही भाजपची सरकारे स्थापन झाली आहेत. समाजातील सर्व स्तरातील लोकांचा पंतप्रधान मोदींवर विश्वास निर्माण झाला आहे, कारण गेली नऊ वर्षे एक नेता घर संसार सोडून २४ तास भारताचा विचार करतो. कोरोना महामारीत जगात लोक भुकेने मरत होते, पण भारतात एकाही व्यक्तीला भुकेने मरू दिले नाही. सर्वांपर्यंत अन्न पोहचवणारे पंतप्रधान मोदी होते. जगाच्या पाठीवर चार ते पाच देश आहेत, ज्यांना कोरोनाची लस तयार करता आली. आपल्या देशात लस तयार झाली असून १३५ कोटी भारतीयांना ती मोफत देत त्यांना जगवण्याचे काम पंतप्रधान मोदींनी केले, असे उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

आपण सत्तेसाठी जन्माला आलो नाही. सत्ता आपल्यासाठी एक साधन आहे, ज्याचा उपयोग करून सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन करायचे आहे. सामाजिक, आर्थिक लढाईतील एक परिवर्तन म्हणून आपण सत्तेकडे पाहतो, असेही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

### गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी राज्य शासन प्रयत्नशील -ना. मंगलप्रभात लोढा

अभिवादन सभेनंतर श्री शिवप्रतिमेची पालखीतून मिरवणूक राजदरबार ते श्री शिवसमाधी स्थळापर्यंत नेण्यात आली. या ठिकाणी श्री शिछत्रपतींना मानवंदना देण्यात आली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाचे अध्यक्ष रघुजीराजे आंग्रे, सरकार्यवाह पांडुरंग बलकवडे, कार्यवाह सुधीर थोरात, स्थानिक उत्सव समिती महाडचे अध्यक्ष त्रिंबक पुरोहित, कार्यवाह संतोष कदम आदींनी विशेष मेहनत घेतली.

### पनवेल मनपा मालमत्ता कराविरोधातील याचिका उच्च न्यायालयाने फेटाळली

सत्ताधारी भाजपने महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत कराचे दर ५० टक्क्यांनी कमी करण्यासाठी ठराव केला होता. त्यानंतर प्रशासनाने ३५ टक्क्यांना संमती दिली आणि यापेक्षा कराचे दर कमी केले तर राज्यातील अन्य काही महापालिकांप्रमाणे पगारालाही पैसे उरणार नाही अशी चिंता व्यक्त केली. त्यामुळे ३५ टक्के कर कपातीवर थांबावे लागले. दरम्यान, सिडको वसाहत हद्दीतील नागरिकांना एकाच वेळेला महापालिकेचा कर व सिडकोचा सेवा कर हे दोन्ही भरावे लावू नये म्हणून सत्ताधारी भाजपने ठराव केला आणि राज्य सरकारकडे पाठपुरावा केला. आमदार प्रशांत ठाकूर यांनीही राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात याकडे शासनाचे लक्ष वेधून मार्ग काढण्याची मागणी केली. पनवेल महापालिका क्षेत्रातील नागरिकांना मालमत्ता करात दिलासा देण्यासाठी कायद्यात काही बदल करावा लागला तरी तो करून पनवेलकरांना मदत करावी, अशी विनंती त्यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना केली.

दरम्यान, पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील मालमत्ता कर आकारणीस हरकत घेत खारघर को. हौसिंग सोसायटीज फेडरेशन लि.च्या वतीने मुंबई उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल करण्यात आली होती. याबाबतीत न्यायालयात वेळोवेळी सुनावण्या झाल्या. या याचिकेवर ३० मार्च रोजी उच्च न्यायालयात दोन्ही बाजूंनी वाद-प्रतिवाद करण्यात आला होता.

न्यायमूर्ती महोदयांनी ही याचिका विचारात घेता येणार नाही तसेच ही याचिका कायद्यात किंवा तथ्यावर टिकू शकत नसल्याने ती फेटाळण्यात येत असल्याचा निकाल दिला. महापालिकेच्या वतीने जेष्ठ विधिज्ञ ॲड. आशितोष कुंभकोणी यांनी बाजू मांडली, तर ॲड. केदार दिघे यांनी पालिकेच्या वतीने काम पाहिले.

काही मंडळी मालमत्ता करास विरोध करीत असताना दुसरीकडे अनेक नागरिक मालमत्ता कर भरत आहेत. मालमत्ता कराची मार्च महिन्यात एकूण ४३ कोटींची वसुली झाली. त्यामध्ये ३१ मार्च या एकाच दिवशी १४ कोटींचा कर वसूल झाला. एकूणच या वर्षी आतापर्यंतची सर्वाधिक वसुली महापालिकेने केली आहे. यातून एकूण २७४ कोटींचा महसूल पालिकेकडे जमा झाला आहे.

या पार्श्वभूमीवर बोलताना आयुक्त गणेश देशमुख यांनी, महापालिकेचा मालमत्ता कर हा शहराच्या विकास कामासाठी असल्याने तो भरणे अनिवार्य आहे. महापालिका क्षेत्रातील नागरिकांनी आपला मालमत्ता कर भरून शहराच्या विकासास हातभार लावावा, असे आवाहन केले आहे.

### बामणडोंगरीत हनुमान जन्मोत्सव सोहळा

या संघातील खेळाडूंना पारितोषिक स्वरूपात ११ टू व्हिलर बाईकही मिळाल्या. त्याबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या सर्व खेळाडूंचे कौतुक केले व त्यांना प्रोत्साहन देण्याकरिता संघातील २० खेळाडूंना प्रत्येकी पाच हजार आणि बामणडोंगरी रत्न असलेल्या तीन खेळाडूंना प्रत्येकी १० हजार रुपये देण्याचे जाहीर केले.

या कार्यक्रमास काँग्रेस जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, माजी जि. प. सदस्य रवींद्र पाटील, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, भाजप उलवे नोड १ सरचिटणीस अंकुश ठाकूर, वहाळ ग्रामपंचायत सदस्य सदस्य गीता ठाकूर, योगिता नाईक, सदस्य वितेश म्हात्रे, भाजपचे बामनडोंगरी गाव अध्यक्ष नंदकुमार ठाकूर, दीपक गोंधळी, नामदेव ठाकूर, सुहास गोंधळी, नाना गडकरी, प्रकाश ठाकूर, अरुण नाईक, प्रितम नाईक, अरुण नाईक, कामगार नेते रवी नाईक, अश्विन नाईक, चंद्रकात महात्रे, प्रकाश म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, खेळाडू आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हनुमान मंदिरासाठी तसेच खेळाडूंना केलेल्या आर्थिक मदतीबद्दल बामणडोंगरी ग्रामस्थांनी आणि जीवदानी स्पोर्ट्सच्या खेळाडूंनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आभार मानले.

### पनवेलमध्ये भाजप स्थापना दिन उत्साहात

माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, प्रकाश बिनेदार, समीर ठाकूर, संतोष भोईर, माजी नगरसेविका दर्शना भोईर, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्ष वर्षा नाईक, भाजप शहर सरचिटणीस अमरीश मोकल, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, शहर अध्यक्ष रोहित जगताप, पवन सोनी, भाजप दक्षिण भारतीय सेल संयोजक माधुरी श्रीनिवास कोडुरू, करंजाडे विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, करंजाडेचे सरपंच मंगेश शेलार, सुहासिनी केकाणे, अंजली इनामदार यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पक्ष स्थापना दिनाच्या अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे कार्यकर्त्यांना संबोधित केले. ध्वजारोहण झाल्यानंतर उपस्थित सर्वांनी पंतप्रधानांचे विचार ऐकले.

दरम्यान, भाजप आजपासून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीपर्यंत म्हणजे १४ एप्रिलपर्यंत विशेष सप्ताह साजरा करणार आहे. ११ एप्रिलला समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले व १४ एप्रिल रोजी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती सर्व बूथ, मंडल, जिल्हा व राज्य कार्यालयात साजरी करण्यात येणार आहे.

# बामणडोंगरीत जलकुंभाचे लोकार्पण

## ■ लोकनेते रामशेठ ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील बामणडोंगरी येथे ग्रामस्थांची पाण्याची अडचण लक्षात घेऊन सिडकोच्या माध्यमातून जलकुंभ उभारण्यात आला आहे. त्याचे लोकार्पण माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी (दि. ६) करण्यात आले.

बामणडोंगरी येथे पिण्याच्या पाण्याची साठवणूक करण्याकरिता जलकुंभाची आवश्यकता होती. यासाठी ग्रामपंचायतीने सातत्याने सिडकोकडे पाठपुरावा केला. ग्रामस्थांची मागणी लक्षात घेत सिडकोच्या माध्यमातून या ठिकाणी जलकुंभ उभारण्यात आला आहे. गुरुवारी या स्व. कान्हा बाळू गडकरी जलकुंभाचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते लोकार्पण झाले. या कार्यक्रमाला काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, माजी जि. प. सदस्य रवींद्र पाटील, भाजप उलवे नोड १ सरचिटणीस अंकुश ठाकूर, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, दीपक गोंधळी, सुहास गोंधळी, ग्रामपंचयात सदस्य योगिता नाईक, गीता ठाकूर, प्रभाकर ठाकूर, नामदेव ठाकूर, वितेश म्हात्रे, भाजप बामणडोंगरी गाव अध्यक्ष नंदकुमार ठाकूर, दीपक गोंधळी, नामदेव ठाकूर, सुहास गोंधळी, रवी नाईक, नाना गडकरी यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.





पनवेल : येथील शांतेश्वरी महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची निवडणूक बिनविरोध झाली. अध्यक्षपदी उषा देशमुख, तर उपाध्यक्षपदी कल्पना कोळी यांची निवड करण्यात आली. त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांची सदिच्छा भेट घेतली. त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.






पनवेल : भारतीय जनता पक्षाचा स्थापना दिन गुरुवारी पनवेल भाजपच्या वतीने मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळ सभागृह येथे पक्षाचा झेंडा फडकावून उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संयेख्येने उपस्थित होते.



पनवेल : भाजप स्थापना दिनानिमित्त तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी त्यांच्या शेलघर येथील निवासस्थानी पक्षाचा झेंडा फडकाविला. या वेळी त्यांच्या सुविद्य पत्नी शांताबाई भगत सोबत होत्या.



पनवेल : भारतीय जनता पक्षाच्या स्थापना दिनानिमित्त खारघर सेक्टर १५ प्रभाग क्र. ६ येथील घरकुल-स्पॅगिटी संकुल तलावासमोर महापालिकेचे माजी नगरसेवक निलेश बाविस्कर यांच्या माध्यमातून ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमाला माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट दिली. त्यांच्यासमवेत भाजप खारघर-तळोजा मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, शक्ती केंद्रप्रमुख संजय शर्मा, बूथ अध्यक्ष लोखंडे, अग्रवाल समाजाचे मुकेश गर्ग, दुर्गामाता फेरीवाला संस्थेचे सदस्या प्रतीक्षा माळी, अशा मोरे, छाया हरेल, सुनंदा मोरे, मच्छिंदर, दिपाली गायकवाड, गुरव ताई, श्री. पावसे, प्रिया राजकुमार आदी पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक उपस्थित होते. भाजपच्या माध्यमातून खारघरमध्ये माजी नगरसेवक निलेश बाविस्कर यांनी स्थापना दिवसाचा कार्यक्रम त्यांच्या प्रभागामध्ये आयोजित केला असून त्या ठिकाणी कमळाचे चित्रसुद्धा रंगवले होते. (छाया : अक्षय शार्दुल)




कळंबोली : भाजप मध्यवर्ती कार्यालयात भाजपचा ४४वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. या वेळी भाजपाचा ध्वज फडकावून त्याला अभिवादन करण्यात आले व नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विचार सर्वांनी एकत्रित ऐकले. माजी नगरसेवक राजेंद्र शर्मा, माजी नगरसेविका मोनिका महानवर, भाजप भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हा संयोजक बबन बारगजे, महिला आघाडी शहराध्यक्ष मनीषा निकम, सरचिटणीस दुर्गा सहानी, कळंबोली सरचिटणीस दिलीप बिष्ट, संजय दोडके, प्रकाश शेलार, युवा मोर्चा जिल्हा सचिव जमीर शेख, जनार्दन पाटील युवा नेते संदीप म्हात्रे, सुनील ढेंबरे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



पनवेल : भाजपच्या स्थापना दिनानिमित्त उत्तर रायगड जिल्हा संयोजक माधुरी श्रीनिवास कोडुरू यांच्या नेतृत्वाखाली शासकीय रुग्णालय येथे फळवाटप करण्यात आले. या अभियानात महापालिकेच्या माजी उपमहापौर सीताताई पाटील, भाजप शहर सचिटणीस अमरीश मोकल, भाजप दक्षिण भारत सेल मंडळ उपसंयोजक श्रीमती सुनंदा, राज्य दक्षिण भारत सेल कार्यकारी समिती सदस्य गणेश शेट्टी, जयचंद्र वसू, शहर उत्तर भारतीय सेल शहर संयोजक सरदार कुलबीर सिंग, रुग्णालयाचे उपप्रभारी डॉ. सचिन सकपाळ सहभागी झाले होते.







पनवेल : भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस तथा माजी नगरसेवक नितीन जयराम पाटील यांच्या प्रभाग क्र. १८ येथील जनसंपर्क कार्यालयात भाजप स्थापना दिन साजरा करण्यात आला. या वेळी सोशल मीडिया शहर संयोजक प्रसाद हनुमंते, माजी नगरसेविका नीता माळी, उत्तर रायगड जिल्हा ओबीसी युवा मोर्चा अध्यक्ष प्रसाद म्हात्रे, उमेश इनामदार, महेश सरदेसाई, प्रसाद कंधारे, आदिती मराठे, सुहासिनी खिल्लारे, लीना पाटील, वैभवी गुरव, विनीत मढवी, राजा चव्हाण, नरेंद्र सोनवणे, अनिकेत जाधव, परेश बोरकर, रमेश हुबळी, सनी बेद, विजय डिसोझा, मयूर भोपी, रुपेश नागवेकर, राजू सावंत, सचिन नाझरे, राजेंद्र पाटील, जाफर मोमीन, मनोज पाटील आणि इतर पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



पनवेल : भाजपच्या स्थापना दिनानिमित्त महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी आपल्या घरासमोर पक्षाचा झेंडा फडकाविला. या वेळी कविता पाटील, अरूणा पाटील, अजिंक्य सोसायटीच्या सेक्रेटरी श्वेता वाणी उपस्थित होत्या.





पनवेल : भाजप स्थापना दिनानिमित्त शहर मंडलमधील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आपल्या घरात आणि टेरेसवर झेंडे फडकवून स्थापना दिन साजरा केला.



पनवेल : श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत वैकुंठवासी हभप अप्पा माउली यांच्या कृपाशीर्वादाने आणि हभप बानुबाई यांच्या उपस्थितीत गव्हाण येथील शांतादेवी मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाला तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट दिली. येथे बुधवारी रात्री कीर्तनकार हभप भगिरथमहाराज काळे (सिन्नर, नाशिक) यांचे कीर्तन झाले. (छाया : अक्षय शार्दुल)



## संपादकीय

# ‘व्हीआयपी विकारा’चे बळी

राजकीय पक्ष वा नेत्यांना चौकशी आणि खटल्यांच्या विरोधात संरक्षणाची मागणी करता येणार नाही तसेच राजकीय नेत्यांना नागरिक म्हणून विशेष हक्कही देता येणार नाहीत असे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी बुधवारीआपल्या निकालात स्पष्ट केले. भ्रष्टाचारी नेत्यांना ते कायद्यापेक्षा श्रेष्ठ असल्याचे वाटत असले तरी त्यांच्यासाठी वेगळा न्याय नाही. हेच या निकालातून सिद्ध झाले आहे.

**भारताला स्वातंत्र्य बहाल करून इंग्रज साहेब चंबुगबाळे उचलून १९४७ साली मायदेशी निघून गेला. तरीही इतक्या वर्षांनंतरही साहेबीपणाचे काही अवगुण त्याने बहुदा मागेच ठेवले आहेत असे दिसते. जनसामान्यांपेक्षा आपण कुणीतरी श्रेष्ठ दर्जाचे मनुष्य आहोत असा गंड काही नेत्यांमध्ये ठळकपणाने दिसून येतो. २०१४ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाची सूत्रे हाती घेतल्यानंतर या ‘व्हीआयपी’ सिंड्रोम अर्थात विकाराने ग्रस्त असलेल्यांच्या भ्रमाचा भोपळा फुटला. सर्वप्रथम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंत्री आणि नामदारांसाठी असलेल्या सरकारी मोटारीवरचा लाल दिवाच काढून टाकला. त्यानंतर भ्रष्टाचाराने लिप्त असलेल्या, सरंजामी आणि दरबारी राजकारणाने पुष्ट झालेल्या राजकीय नेत्यांवर एका पाठोपाठ एक प्रहार केले. विशेषत: भ्रष्टाचारी नेत्यांविरुद्ध त्यांनी जी धडक कारवाई सुरू केली, ती आजतागायत चालू आहे. २००४ ते २०१४ हे युपीएच्या कार्यकाळातील दशक ‘एक हरवलेले दशक’ म्हणून इतिहासात नोंदले जाईल. युपीएच्या राजवटीत देखील ईडी आणि सीबीआयसारख्या तपासयंत्रणांच्या कारवाया सुरू होत्या. त्या काळात भ्रष्ट राजकीय नेत्यांकडून सुमारे साडेपाच हजार कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली होती. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकारच्या नऊ वर्षांच्या कार्यकाळात तब्बल एक लाख १८ हजार कोटी रुपये अशा आर्थिक गुन्हेगारांकडून वसूल करण्यात आले आहेत. साहजिकच काही विरोधी नेत्यांची त्यामुळे पाचावर धारण बसली आहे हे वेगळे सांगायला नको. ईडी आणि सीबीआयसारख्या केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर सुरू असल्याची आरडाओरड गल्लीपासून दिल्लीपर्यंत सुरू आहे ती त्यामुळेच. राजकीय नेत्यांच्या विरोधातील केंद्रीय तपास यंत्रणांच्या कथित गैरवापराला आळा घालण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे आखून देण्याची विनंती १४ विरोधी पक्षांच्या संयुक्त याचिकेद्वारे सर्वोच्च न्यायालयाला करण्यात आली होती. त्याचा बुधवारी निकाल लागला. अर्थातच विरोधी पक्षांची ही याचिका सर्वोच्च न्यायालयाने सपशेल फेटाळली. राजकीय पुढाऱ्यांचे हितसंबंध जपण्यासाठी ही याचिका दाखल करण्यात आली आहे. केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर होत असल्याचा एकही ठोस अथवा सबळ पुरावा नसताना या संदर्भात कोणताही आदेश देता येणार नाही असा निर्वाळा सरन्यायाधीशांनी आपल्या संबंधित निकालात दिला. विरोधी पक्षांच्या ईडीविरोधी राजकीय मोहिमेला हा चांगलाच दणका मिळाला आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, आम आदमी पार्टी, भारत राष्ट्र समिती, समाजवादी पार्टी, ठाकरे गट आदी १४ विरोधी पक्षांनी ही संयुक्त याचिका दाखल केली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राज्यात व्हीआयपी संस्कृतीला सुरुवातीपासूनच स्थान नव्हते आणि यापुढेही असणार नाही. कायद्यासमोर सर्वच एकसमान आहेत हे या निकालाने निर्विवादपणे अधोरेखित झाले आहे. या संदर्भात राजकीय ओरड करणारे विरोधी पक्षातील ‘व्हीआयपी विकारा’चे बळी लवकर बरे होवोत हीच प्रार्थना.**

# संघर्षातून यश गाठणारा लढवय्या आमदार महेंद्र थोरवे

कर्जत विधानसभा मतदारसंघातील विद्यमान आमदार महेंद्र सदाशिव थोरवे यांचे संपूर्ण जीवनच संघर्षमय आहे. नोकरीत संघर्ष, राजकारणात संघर्ष सर्वच ठिकाणी संघर्ष करीत त्यांची यशाकडे वाटचाल सुरू आहे. अवघ्या साडेतीन वर्षांत तब्बल सातशे कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून कर्जत मतदारसंघाच्या विकासाचा ध्यास घेतलेले आमदार म्हणून त्यांचा विक्रमच म्हणावा लागेल.



महेंद्र थोरवे यांनी अगदी संघर्षमय जीवन जगले, मात्र जिद्द आणि मेहनत तसेच ’डेअरिंग’ या त्यांच्या स्वभावामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेची कोणतीही निवडणूक न लढवता थेट विधानसभेची निवडणूक लढविली. २०१४च्या निवडणुकीत शिवसेनेने उमेदवारी न दिल्याने शेतकरी कामगार पक्षाशी सलगी करून ते मैदानात उतरले.. त्यांनी पहिल्या काही फेऱ्यांमध्ये आघाडीही घेतली होती, मात्र त्यांचा निसटता प्रभाव झाला तोसुद्धा फक्त १८०० मतांनी. या मतदारसंघात सर्वांत कमी मतांनी पराभव स्वीकारावा लागलेले थोरवे हे पहिले उमेदवार म्हणावे लागतील.

महेंद्र थोरवे यांचे वडील सदाशिव आणि आई सुंदराबाई हे दोन्ही उभयता अगदी साधे. साधी राहणी, परंतु प्रचंड सहनशील. त्यांचे मनोहर हे मोठे बंधू त्यानंतर सौ. मनीषा ही मोठी बहीण आणि विश्वनाथ हे धाकटे बंधू. त्यांना दोन अपत्य आहेत. थोरला कु. सुशांत हा परदेशात म्हणजे लंडनला उच्च शिक्षण घेत आहे, तर कु. सुरभी ही मुंबईतील रूईया महाविद्यालयात कला शाखेच्या शेवटच्या वर्षात शिक्षण घेत आहे. थोरवे यांना मात्र शिक्षण घेतानाच संघर्ष करावा लागला. त्यांच्या घरची परिस्थिती बेताची असल्यामुळे त्यांना मामाकडे म्हणजे पनवेल तालुक्यातील अजिवली येथे प्राथमिक शिक्षण घेणे भाग पडले. त्यानंतर त्यांनी पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रात रिलायन्स कंपनीत नोकरी केली. तीही ठेकेदार पद्धतीने. त्या वेळी कंपनीत कामगारांच्या मागण्यांसाठी संघर्ष झाला त्यात थोरवे यांनी नेतृत्व केले. तेथेही संघर्षच. या घटनेच्या माध्यमातून त्यांनी समाजकारणात प्रवेश केला. रिलायन्स कंपनीची नोकरी थोडे दिवस केल्यानंतर त्यांनी ती सोडली आणि मग रिक्षेचे स्टेअरिंग हाती घेतली. तेथेही त्यांचे मन रमेना. त्यांनी नंतर छोट्या घरगुती सिलिंडर विक्रीचा व्यवसाय केला. हा व्यवसाय बरा चालला होता. त्यातूनच त्यांना एक नवीन व्यवसाय मिळाला आणि त्यांचे जीवनच बदलले. तो व्यवसाय म्हणजे जमीन खरेदी-विक्री.त्यानंतर २०१२ जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक जाहीर झाली. त्यामध्ये ते स्वतः न उतरता शिवसेनेकडून पंचायत समितीच्या गौरकामत गणातून त्यांनी त्यांचे ज्येष्ठ बंधू मनोहर थोरवे यांना आणि पिंपळोली गणातून त्यांनी त्यांच्या सौभाग्यवती मीनाताई थोरवे यांना उमेदवारी मिळविली. या निवडणुकीत या दोघांनीही अगदी मातब्बर उमेदवारांचा पराभव करून पंचायत समितीत प्रवेश केला. त्या वेळी मनोहर थोरवे पंचायत समितीचे उपसभापती झाले. हे यश त्यांना राजकारणाची दिशा दाखवून गेले. आदर्श पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट ही संस्था स्थापन करून त्यांनी आईच्या नावाने सुंदर इंग्लिश मीडियम सीबीएसई स्कूल सुरू करून ग्रामीण भागातील मुलांना इंग्रजी शिक्षणाची दालने उघडली. त्याचप्रमाणे महेंद्र थोरवे प्रतिष्ठान स्थापन करून समाजकार्याची मुहूर्तमेढ रोवली.

सन २०१४ महेंद्र थोरवे यांना अपयशी वर्ष गेले, कारण जानेवारी २०१४ साली झालेल्या नगरपरिषद निवडणुकीत त्यांची भगिनी सौ. मनीषा जनार्दन भासे यांचा निसटता पराभव झाला. त्यानंतर नऊ महिन्यांनी म्हणजे ऑक्टोबर २०१४मध्ये त्यांनी विधानसभेची निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. विशेष म्हणजे त्यांनी यापूर्वी कोणतीही निवडणूक लढविली नव्हती. त्यांच्या या निर्णयाची काही जण खिल्ली उडवित होते. या निवडणुकीत त्यांनी शिवसेनेकडून उमेदवारी मिळविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले, परंतु त्यात त्यांना अपयश आले आणि शिवसेनेने खालापूर तालुक्यातील हनुमंत पिंगळे यांना या मतदारसंघातील उमेदवारी जाहीर केली. त्या वेळी कोणत्याही परिस्थितीत विधानसभेची निवडणूक लढवायची असा चंग त्यांनी बांधला आणि अपक्ष लढविण्यापेक्षा आयत्या वेळी शेतकरी कामगार पक्षाची उमेदवारी लढविण्याचा निर्णय घेतला. ही निवडणूक तिरंगी व चुरशीची झाली. त्या वेळी आमदार सुरेश लाड यांच्याकडून त्यांचा केवळ १८०० मतांनी पराभव झाला, पण त्यांना दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली व शिवसेनेचे उमेदवार हनुमंत पिंगळे तिसऱ्या स्थानावर फेकले गेले. या निवडणुकीने त्यांना बरेच काही शिकविले. पराभवाने खचून न जाता त्यांनी अपयशाचे आत्मपरीक्षण केले आणि त्या दृष्टीने काम सुरू केले. त्यांनी पुन्हा शिवसेनेत प्रवेश केला. जानेवारी २०१९ साली त्यांचे भाचे संकेत जनार्दन भासे यांना कर्जत नगर परिषदेच्या स्वीकृत नगरसेवकपदी बसविले. समाजकारणाबरोबरच राजकारणातही असलेले त्यांचे पुतणे प्रसाद थोरवेसुद्धा एक युवा नेतृत्व म्हणून उदयास येत आहे.


२०१९ची निवडणूक जाहीर झाली. तत्पूर्वी २०१७ साली झालेल्या पंचायत समिती निवडणुकीत चांगले यश मिळाल्याने या वेळी शिवसेनेकडून नक्की उमेदवारी मिळणार अशी अपेक्षा त्यांना होती, परंतु अगदी शेवटच्या क्षणी उमेदवारी मिळाली. त्यासाठीही ’संघर्ष’ करावा लागला. ही निवडणुक त्यांनी अगदी नियोजनबद्ध पद्धतीने लढविली. गेल्या निवडणुकीत ज्या भागात मते कमी पडली त्या भागात त्यांचे बंधू मनोहर थोरवे यांनी पद्धतशीर लक्ष ठेवले तसेच भारतीय जनता पक्षनेही त्यांना भरभरून मते दिली आणि त्यांचा १८ हजार मतांनी विजय झाला. त्यांनी आमदार सुरेश लाड यांना पराभूत करून ’दसपटीने’ परतफेड केली आणि विधानभवनात पाय ठेवला.

भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना युतीचे राज्य पुन्हा येईल असे वाटत असताना अनपेक्षितपणे महाविकास आघाडी स्थापन होऊन शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रीय काँग्रेसचे सरकार आले. आमदार महेंद्र थोरवे यांना कोणताही अनुभव नसताना मतदारसंघात शेकडो कोटी रुपयांचा निधी आणला व खऱ्या अर्थाने विकासाची गंगा मतदारसंघात आली. प्रशासकीय इमारत, नद्यांवरील पूल, विशेष म्हणजे कर्जतमधील महाराष्ट्र भूषण ज्येष्ठ निरूपणकार डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या नावाची स्वागत कमान, प्रति आळंदी साकारून तेथे श्री विठ्ठलाची पन्नास फूट उंचीची मूर्ती, नदीच्या पलीकडे शिवसृष्टी आणि त्याच्याच लगत स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक ही कामे हाती घेऊन ती पूर्ण होत आहेत.

यानंतर काही महिन्यांपूर्वी राजकीय घडामोडी झाल्या आणि महेंद्र थोरवे यांनी वरिष्ठ नेते एकनाथ शिंदे यांची साथ देण्याचे ठरविले. एकनाथ शिंदे मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले. शिंदे यांच्या अत्यंत जवळचे सहकारी म्हणून थोरवे यांची ओळख बनली आहे. त्यानंतर त्यांनी पुन्हा विकास निधी आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले. कर्जत शहरातील उल्हास नदीवरील श्रीराम पुलाच्या शेजारी नवीन पूल उभारण्यासाठी भूमिपूजनसुद्धा केले. अनेक रस्ते व पुलांसाठी निधी उपलब्ध करून घेतला. त्यांच्या कामाची पद्धतच वेगळी आहे. त्यांचा गुण विशेष म्हणजे झटकन निर्णय घेणे. कुणालाही रित्या हाताने न पाठवणे. एकदा मनावर घेतले की ते काम झाल्याशिवाय ते स्वस्थ बसत नाहीत याची अनेक उदाहरणे आपण प्रत्यक्ष अनुभवत आहोत.

आमदार महेंद्र थोरवे यांचे पक्षातील पदाधिकारी, सहकारी अभिषेक सुर्वे, रोहित विचारे, गणेश शेलार, उमेश काठवले आदींच्या बरोबर मतदारसंघातील जनतेला न्याय देण्याचा प्रयत्न करीत आहेत. आमदार थोरवे यांच्या कार्यपद्धतीवर खुश होऊन अनेक जण पक्ष प्रवेश करीत आहेत. त्यांचा आज वाढदिवस आहे. त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांना आयुरारोग्य लाभो हीच परमेश्वरचरणी प्रार्थना!

**-विजय मांडे,**
**ज्येष्ठ पत्रकार, कर्जत**



## बदलते तंत्रज्ञान



# व्हॉट्सअ‍ॅप डिझाईनमध्ये होणार मोठे बदल



करोडो भारतीय व्हॉट्सअ‍ॅप हे वापरतात. व्हॉट्सअ‍ॅप एक सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आहे. हे मेटाच्या मालकीचे आहे. यावरून तुम्हाला एकमेकांशी संवाद साधता येतो. व्हिडीओ कॉलिंग, मेसेजिंग, आपले फोटो, व्हिडीओ शेअर करणे अशा अनेक गोष्टी तुम्हाला करता येतात.

व्हाट्सअ‍ॅप हे आपल्या वापरकर्त्यांसाठी नेहमीच नवीन काही ना काही फिचर आणून वापरकर्त्यांचा विविध सुविधा देत असतो. आतासुद्धा व्हाट्सअ‍ॅपने वापकर्त्यांना अ‍ॅप आणखी सुलभतेने वापर करता यावा या कारीता मोठे बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. WaBetaInfo ने दिलेल्या माहितीनुसार व्हॉट्सअ‍ॅप आता नवीन डिझाईनमध्ये दिसणार आहे.व्हाट्सअ‍ॅपचे हे नवीन बदल कोणते आहेत हे जाणून घेऊयात.

**काय होणार बदल?**

सध्या तुम्ही व्हाट्सअ‍ॅप वापरत असताना तुम्हाला चॅट्स, कॉल्स, कम्युनिटीज आणि स्टेट्स सारखे टॅब वरच्या बाजूला दिसतात. आता नवीन डिझाईनमध्ये ते खालच्या बाजूस दिसणार आहेत. यामुळे वापरकर्त्यांना अनेक ठिकाणी नेव्हिगेट करणे सोपे होणार आहे. सध्या काही वापरकर्त्यांना टॅब स्वीच करणे कठीण जात आहे. मुख्यतः फोनचा आकार मोठा असल्यास ही अडचण निर्माण होते. हे फीचरसाठी वापरकर्त्यांकडून खूप मागणी होत होती. वापरकर्त्यांना हे सर्व टॅब खालच्या बाजूस दिसावेत असे वाटत होते. व्हाट्सअ‍ॅप आपल्या वापरकर्त्यांना चान्गला अनुभव मिळावा यासाठी हे बदल करत आहे. यामध्ये किरकोळ पुनर्रचना करण्यात येणार आहे. अद्याप व्हाट्सअ‍ॅपने कोणतेही उत्तर दिलेले नाही.नवीन बदल व्हाट्सअ‍ॅप बीटा अँड्रॉइड २.२३.८.४ अपडेटमध्ये दिसून आला आहे.

याशिवाय व्हॉट्सअ‍ॅप एका मोठ्या प्रायव्हसी फीचरवर देखील काम करत आहे. ज्यामुळे तुम्हाला चॅट लॉक आणि लपवता येणार आहे. व्हॉट्सअ‍ॅपच्या कॉन्टॅक्ट इन्फो सेक्शनमध्ये चॅट लॉक करण्याचा पर्याय दिसेल. लोक चॅटसाठी पासकोड आणि फिंगरप्रिंट लॉक सेट करू शकतील. हे फीचर लवकरच सुरू होणार आहे.

# राष्ट्रवादाचा ७२ वर्षांचा अखंड प्रवास

डॉ श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी १९५१ मध्ये राष्ट्रवादाच्या प्रखर विचारधारेवर आधारित जनसंघाची स्थापना केली. त्या वेळी भारतीय राजकारणाच्या अवकाशात काँग्रेस, समाजवादी, साम्यवादी या विचारधारांबरोबरच हिंदू महासभा, रिपब्लिकन पक्ष यांचे प्रामुख्याने अस्तित्व होते. काँग्रेस, समाजवादी आणि साम्यवादी या विचारधारांचा तोंडावळा थोड्या फार फरकाने मिळता-जुळता होता. कम्युनिस्टांमधील काही मंडळी मात्र भारतीय राष्ट्रवादाच्या विरोधात खुलेआम उभी होती.



## निमित्त

ब्रिटीशांची १५० वर्षे संघर्ष करून मिळालेल्या स्वराज्याचे रूपांतर सुराज्यात करण्यासाठी प्राचीन भारतीय परंपरांचा आधार घेत निखळ राष्ट्रवादाचा संकल्प प्रत्यक्षात आणण्याची इच्छाशक्ती असलेले देशव्यापी नेतृत्व नसल्याने भारतीय जनसंघाची स्थापना झाली. देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंतच्या घडामोडी, काश्मीर बळकावण्यासाठी पाकिस्तानने केलेली घुसखोरी, जम्मू-काश्मीरचा बळकावळेला भू-भाग स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काश्मीरसारख्या संवेदनशील राज्याला दिला गेलेला वेगळा दर्जा यामुळे भारतीय एकात्मतेपुढे मोठा धोका निर्माण झाला होता.

डॉ. मुखर्जी यांनी राष्ट्रीय एकात्मतेपुढे निर्माण झालेले आव्हान लक्षात घेऊन जनसंघाची स्थापना झाल्या-झाल्या काश्मीरसाठीच्या ३७०व्या कलमाविरोधात आंदोलन पुकारले. तेव्हापासून ‘जनसंघ’नामक भारतीय राष्ट्रवादाच्या विचारधारेचा प्रवास सुरू झाला. हा प्रवास १९८०पासून भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून नव्याने सुरू झाला. १९५२ मध्ये झालेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत जनसंघाच्या वाट्याला अवघ्या तीन जागा आल्या होत्या. अर्थात काँग्रेस, समाजवादी या प्रबळ विचारधारांपुढे नव्या पर्याय रूजवणे सहज शक्य नव्हते. अनेक खास खळग्यांचा प्रवास करत आपण गेली ७२ वर्षे भारतीय राजकारणात पाय रोवून उभे आहोत. १९५०च्या दशकात आपल्याबरोबर राष्ट्रीय राजकारणात असलेले समाजवादी, साम्यवादी विचारधारेचे अनेक पक्ष काळ्याच्या ओघात दिसेनासे झाले आहेत.

१९६०, १९७०, १९८० या दशकात तयार झालेले अनेक प्रादेशिक पक्षही आपल्या अस्तित्व हरवून बसले आहेत. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी आपल्या वैचारीक आधाराच्या बळावर राष्ट्रीय राजकारणाचा अवकाश व्यापून राहीली आहे. जनसंघाने वेगवेगळ्या आंदोलनाच्या माध्यमातून राष्ट्रवादाचा विचार राष्ट्रीय राजकारणात जिवंत ठेवला. काश्मीरला स्वतंत्र दर्जा देण्याविरोधात, ‘एक देश में दो निशान, दो प्रधान नहीं चलेंगे’, असे म्हणत डॉ. मुखर्जी यांनी जनसंघाच्या सत्याग्रहींसह काश्मीरमध्ये प्रवेश केला. त्यावेळी काश्मीरमध्ये प्रवेश करण्यासाठी परवान्याची गरज लागत असे. आपल्याच देशातील एका राज्यात प्रवेश करण्यासाठी परवाना कशाला, असा प्रश्न जनसंघाने उपस्थित केला. डॉ.मुखर्जींना काश्मीरात प्रवेश केल्याबद्दल तुरुंगात टाकले गेले. कारावासातच त्यांचा गूढमृत्यू झाला. जनसंघाने बेरुबारी व गोवा मुक्ती चळवळ यासारख्या आंदोलनात पुढाकार घेतला.

जनसंघाच्या अनेक कार्यकर्त्यांनी गोवा संग्रामात बलिदान दिले. जनसंघाचे कच्छ करार व ताश्कंद कराराविरोधी आंदोलनही उल्लेखनीय आहे. पाकिस्तानने मार्च १९६५मध्ये कच्छतील कांजरकोट ताब्यात घेतले व आपली घुसखोरी चालूच ठेवली. भारतीय सरकार पाकिस्तानसोबत समझोता करू इच्छित होते, ज्याला भारतीय जनसंघाने तीव्र विरोध दर्शविला. १६ ऑगस्ट रोजी संपूर्ण देशातून जवळपास पाच लाख आंदोलक कच्छ कराराला विरोध दर्शवण्यासाठी दिल्लीत जमा झाले. देशाच्या राजकीय इतिहासातील हे सर्वात मोठे आंदोलन होते. ‘फौज ना हारी, कौम ना हारी, हार गयी सरकार हमारी’ ही या आंदोलनाची घोषणा होती. अशा राष्ट्रवादाच्या विचारातून जनसंघाने अनेक आंदोलने केली. यातून जनसंघाचा पाया हळूहळू विस्तारत गेला. १९६७मध्ये जनसंघाचे ३५ खासदार निवडून येऊन काँग्रेसनंतरचा सर्वाधिक जागा मिळवणारा पक्ष जनसंघ ठरला.

**-सागर भदे**

## क्लिक...क्लिक...!



**पनवेल : फळाचा राजा आणि कोकणाची ओळख असलेला आंबा हा बाजारपेठेत दाखल झाला आहे. अवकाळी पावसामुळे यंदा उत्पादानावर थोडा फार परिणाम झाला, पण आंब्यांचे आगमन झाल्याने खवय्यांची यंदाच्या हंगामातील पर्वणी सुरू झाली आहे.**

## आरोग्य प्रहर

# रानमेवा करवंद हाडांसाठी उपयुक्त

‘डोंगरची काळी मैना’ म्हणून प्रचलित असलेले करवंद हे काळे लहानग्या आकाराचे फळ आरोग्याच्या दृष्टीने फार उपयुक्त आहे. सहसा जंगलामध्ये, डोंगरकड्यांवर याची झाडे असतात.



करवंद हा रानमेवा आरोग्यरक्षणासाठी सर्वांनी आवर्जून खावा. करवंद हिंदीमध्ये ‘खट्टा मीठा’ या नावाने प्रसिद्ध आहे, तर शास्त्रीय भाषेत उवाऊर्सी या नावाने ओळखले जाते. करवंद ही वनस्पती अपोसायनेसी या कुळातील आहे.

करवंद हा रानमेवा आहे, तो नैसर्गिकरीत्या उपलब्ध झालेला असल्यामुळे याच्या सेवनाने दुष्परिणाम होत नाहीच, शिवाय आरोग्यासही हितावह आहे. सहसा मोठ्या शहरांमध्ये हा रानमेवा मिळत नसल्यामुळे बरेच जण याच्या स्वादापासून व यातून मिळणाऱ्या पौष्टिक घटकांपासून वंचित राहतात.

रक्ताच्या कमतरतेमुळे अशक्तपणा जाणवत असेल तर रोज मूठभर करवंदे खावीत. याने रक्ताची कमतरता नक्कीच भरून येईल.

करवंदामध्ये ‘क’ जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असल्याने त्वचाविकारामध्ये करवंद सेवनाचा फायदा दिसून येतो. तसेच ‘क’ जीवनसत्त्वामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्तीदेखील वाढते. करवंदामध्ये मोठ्या प्रमाणात सायट्रिक सिड असल्यामुळे उष्णतेमुळे होणारे विकार करवंद सेवनाने कमी होतात.

करवंदामध्ये फायबर भरपूर प्रमाणात असल्याने मलावष्टंभाचा त्रास कमी होतो. अरुची, मळमळ, उलटी या विकारांमध्ये करवंदे अत्यंत गुणकारी आहेत.

करवंदामध्ये ‘क’ जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असल्याने हृदयविकारामध्ये करवंदाचे सेवन उपयुक्त ठरते. यामुळे रक्तवाहिन्यातील चरबीचे प्रमाण कमी होऊन रक्तपुरवठा सुरळीत होतो. करवंदे वातशामक असल्यामुळे पोटात गुबारा धरला असेल तर करवंद सेवनाने पोट व आतड्यांचे आरोग्य चांगले राहून वायूचे मलावाटे निस्सरण होते.

करवंदाची पाने हीदेखील औषधी गुणधर्माने युक्त आहेत. ही पाने मधामध्ये बारीक करून खाल्ल्यास कोरडा खोकला नाहीसा होतो.

करवंदामध्ये नैसर्गिकरीत्या कॅल्शिअम भरपूर प्रमाणात असल्याने हाडांच्या विकारांमध्ये करवंद सेवनाचा लाभ होतो. वर्षभर करवंद खाता यावे म्हणून करवंदाचे लोणचे, मुरंबा, सरबत बनवून ठेवावे.

गर्भवतीने उलटी, मळमळ, अरुची ही भावना कमी होण्यासाठी व विपुल प्रमाणात कॅल्शिअम मिळण्यासाठी ऋतूमध्ये मूठभर करवंदे खावीत.

## निवडक

### रोह्यात हनुमान जन्मोत्सव साजरा

**रोहे :** रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात भक्ती भावाने पार पाडण्यात



आला. रोहा शहरातील हनुमान मंदिरात सकाळपासूनच हनुमंताचे दर्शन घेण्यासाठी नागरिकांची गर्दी दिसून आली असेच काही दृश्य तालुक्यातील ग्रामीण भागातील हनुमान मंदिरात दिसून आले आहे. तालुक्यातील गाव गावात हनुमान जयंती निमित्ताने हनुमान मंदिर सजवण्यात आले होते. विद्युत रोषणाई, रंगरंगोटी, विविध रंगाच्या पताका हनुमान मंदिर समोर लावण्यात आले होते. तालुक्यात हनुमान जन्मोत्सव निमित्ताने विविध धार्मिक, अध्यात्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. शहरासह खरापटी, रोठ बुद्रुक, मंदिर, मेढा, भिसे, झोळांबे, दापोली यास तालुक्यातील अन्य भागातील हनुमान मंदिरात विविध कार्यक्रम आयोजितले होते.

### खालापुरात हनुमान जन्मोत्सव उत्साहात



**चौक :** खालापूर तालुक्यातील प्रत्येक गावात हनुमान जन्मोत्सव सोहळा भक्तीमय वातावरणात साजरा झाला. भीलवले येथे पोलीस पाटील अनंत ठोंबरे यांच्या हस्ते पुजा करण्यात आली. त्यानंतर दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. वावंढळ, वावंढळवाडी, विणेगाव, चौक, हातनोली, आसरे, जांभीवली, धामणी, कलोते, नढाळ, लोधिवली, वरोसे, मोरबे, वावर्ले, बोरगाव पाली, सारंग, कोपरी आणि परिसरातील गावात विविध प्रकारच्या धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, सायंकाळी पालखी प्रदक्षिणा घालून महा प्रसाद वाटण्यात आला.त्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

### कर्जत तालुक्यात हनुमान जन्मोत्सव

**कर्जत :** तालुक्यातील बहुतांश गावात श्री हनुमान जन्मोत्सवाला विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. कर्जतच्या पाटील आळीतील श्री हनुमान मंदिरात आदल्या रात्री श्रीपती प्रासादिक भजन मंडळाच्या वतीने



प्रसादबुवा पाटील यांनी संगीत भजन सेवा सादर केली. त्यांना कौशिक वांजळे यांनी मृदुंगावर साथ दिली. जयंतीच्या दिवशी पहाटे मराठा शिक्षण प्रसारक महिला भजनी मंडळाच्या वतीने सुचिता वांजळे यांनी भजन सेवा सादर केली. साडे पाच वाजता श्री हनुमान जन्म करण्यात आला. सायंकाळी श्री गुरुकृपा प्रासादिक भजन मंडळ, विंधणे – उरण यांच्या वतीने दत्तारामबुवा पाटील यांनी संगीत भजन सादर केले. त्यांना पखवाजवर वैभव पाटील, तबल्यावर आकाश पाटील आणि हार्मोनियमवर कुणाल पाटील यांनी साथ संगीत दिली.



**माणगाव : भाजप स्थापना दिवसनिमित्त हर घर झेंडा कार्यक्रम अंतर्गत माणगाव येथील भाजपच्या पंचायतराज व ग्रामविकास विभाग महाराष्ट्र राज्य संयोजक शर्मिला सत्वे यांनी पक्षाचा झेंडा आपल्या घरी लावून भाजप स्थापना दिवस साजरा केला.** (छाया–सलीम शेख,माणगाव)

# मच्छीमारांच्या समस्या शासनाने तातडीने सोडवाव्यात

## आमदार रमेश पाटील यांची मागणी; केंद्राकडे पाठपुरावा करणार –मंत्री मुनगंटीवार

**मुरुड : प्रतिनिधी**

कोकण किनारपट्टीवरील सागरी जिल्ह्यातील मच्छीमार बांधवांच्या समस्यांबाबत मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये भाजप आमदार व कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष रमेश पाटील यांनी मच्छीमार बांधवांच्या अनेक समस्यांवर मत्स्यव्यवसायमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे विशेष लक्ष वेधले आहे.



या सभेत आमदार पाटील यांनी मुंबईतील सर्व कोळीवाड्यांचे सीमांकन पूर्ण करावे व नवीन डी.सी.आर. तयार करून त्याचा २०३४ च्या विकास आराखड्यामध्ये समावेश करण्यात यावा. तसेच सागरी जिल्ह्यातील कोळीवाड्यांचे देखील सीमांकन लवकरात लवकर करावे. कोकण किनारपट्टीवर वारंवार नैसर्गिक आपत्ती येत असल्यामुळे मच्छीमार बांधवांचे प्रचंड प्रमाणात नुकसान होत असून त्यांना तुटपुंजी आर्थिक मदत मिळत असल्याने एन.डी.आर.एफ.चे निकष बदलण्यात यावे, नैसर्गिक आपत्तीमध्ये सागरी किनारी असणाऱ्या मच्छीमार बांधवांच्या घरांचे संरक्षण करण्याकरिता धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्यात यावे व शेतकऱ्यांची १ रुपयांमध्ये विमा पॉलिसी उतरवली जाते त्याच धर्तीवर नैसर्गिक आपत्तीमध्ये नुकसान व अपघात झालेल्या मच्छीमार बांधवांना मदत मिळण्याकरिता मच्छीमार बांधवांची देखील १ रुपयांमध्ये विमा पॉलिसी काढण्यात यावी.

तसेच राष्ट्रीय सहकार विकास निगम योजनेअंतर्गत मच्छीमार बांधवांचे थकीत असलेले ५८८ कोटी रुपये कर्ज माफ करून मच्छीमार बांधवांचा उर्वरित डिझेल परतावा देण्यात यावा अशी मागणी केले. तसचे किनारपट्टीवरील १७३ बंदरातील गाळ काढावा अशा मागण्या मंत्र्यांकडे करून शासनाने मच्छीमार बांधवांना दिलासा द्यावा, अशी मागणी आमदार रमेश पाटील यांनी मत्स्यव्यवसायमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे केली आहे.

### निकष बदलण्यासाठी प्रयत्नशील

*मत्स्यव्यवसायमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी एनडीआरएफचे निकष बदलण्याकरिता केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल, असे सांगून सागरी जिल्ह्यातील समुद्रकिनारी मच्छीमार बांधवांच्या घरांचे नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण करण्याकरीता सर्व सागरी जिल्ह्यात पीडब्ल्यूडी विभागामार्फत धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्यात येतील असे अभिवचन दिले.*

**मच्छीमार बांधवांच्या समस्यांबाबत सरकार अनुकूल असून पुढील काळात या समस्यांची सोडवणूक करून मच्छीमार बांधवांना सरकार नक्की दिलासा देईल**

**–रमेश पाटील,** भाजप आमदार तथा कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष



**मुरुड : छत्रपती शिवाजी महाराज यांची पुण्यतिथी असल्याने गुरुवारी नांदगाव हायस्कूल येथील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी शिव पुतळ्यास पुष्पमाला अर्पण करून त्यांना अभिवादन करताना दिसताहेत.** (छाया : संजय करडे)





**पेण : श्री भवानी जगदंबा देवीच्या यात्रेनिमित्त वाशी येथे जाऊन भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी दर्शन घेतले. परंपरेनुसार चालत आलेल्या मानाच्या देवकाठी (हेलकोट) स्पर्धेचे बक्षीस वितरण त्यांच्या हस्ते झाले. या वेळी भाजप दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील, तालुका अध्यक्ष श्रीकांत पाटील, मंगल ठाकूर, सचिन पाटील, भगवान मोकल, पद्माकर पाटील, निलेश पाटील, जगदंबा देवस्थानचे विश्वस्त मंडळ उपस्थित होते.**

# जिते सरपंचासह असंख्य कार्यकर्ते भाजपत

## गावच्या विकासकामातून कायापालट करणार : जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील

**पेण : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या स्थापना दिनी व हनुमान जन्मोत्सवाचे औचित्य साधत जिते ग्रामपंचायत सरपंच सुप्रिया म्हात्रे यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी आमदार रवीशेठ पाटील यांच्या कार्यप्रणालीवर व जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भाजपत प्रवेश केला.



(छाया : इजाज मनियार)

या प्रवेशामुळे पेण तालुक्यात भाजपची ताकद वाढली असल्याने या जिते विभागात विकास कामांनाही वेग मिळणार आहे. या वेळी जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी सांगितल, जिते गावाचा मागील बॅकलॉग भरून काढून आगामी काळात जिते विभागात विकासाची गंगा आणली जाईल. तसेच विकास कामांना निधी कमी पडू दिला जाणार नाही. प्रवेश करणाऱ्या सर्वांचे भाजपमध्ये सन्मान दिला जाईल असे सांगितले.

आमदार रवीशेठ पाटील, भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील हेच विकास काम करून जिते गावाचा कायापालट करू शकतात यामुळेच जिते सरपंच व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने भाजपमध्ये प्रवेश केला असल्याचे लिलाधर म्हात्रे यांनी सांगितले.

यावेळी भाजपा जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील, तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील तसेच भाजपा पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी लिलाधर म्हात्रे, सरपंच सुप्रिया म्हात्रे, गोरख तांडेल, निलेश तांडेल, सलोनी लांडेल,भावेश तांडेल, निवेश तांडेल, हितेश तांडेल, कुणाल तांडेल, करण तांडेल,रूपेश ठाकूर, दिपेश ठाकूर, रोशन ठाकूर, अविशा ठाकूर, अलंकार ठाकूर, देवेंद्र म्हात्रे, ऋषी ठाकूर, सुरज तांडेल, स्वप्निल म्हात्रे, आकाश ठाकुर, शुभम म्हात्रे, संजय म्हात्रे, सौरभ म्हात्रे, नितीन ठाकूर, कल्पेश ठाकूर, निर्भय रसाळ, मानस म्हाजे, जयेश म्हात्रे आदी कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस ह्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी **श्री. संजय किसन कवडे** यांचे मालकीचा खालील वर्णनाचा व्यापारी गाळा/दुकान खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदरहू व्यापारी गाळा/दुकानाचे वर्णन खालीलप्रमाणे.–

मिळकतीचे वर्णन

**मौजे– कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड** येथील पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील **सेक्टर ७ मधील प्लॉट क्र. २५ग** वर बांधण्यात आलेल्या **श्री गणेश कृपा को. ऑप. हौ. सोसायटी** मधील तळमजल्यावरील व्यापारी गाळा/दुकान क्र.६. क्षेत्र १४ चौ.मी. बिल्टअप अशा वर्णनाची मिळकत तिच्या सोबतच्या तदअनुशंगीक शेअर सर्टीफीकेट इत्यादी सर्व लाभांसह.

तरी सदरहू वर नमुद मिळकतीबद्दल कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काहीही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोश व बोजाविरहीत असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल सदरहू मिळकतीचा खरेदीचे व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

दि. ०६/०४/२०२३
स्थान– कामोठे

**सही/–**
**अॅड. नवीन वि. धोंगडी**
डी– ४०१. ग्रीनस्केप रॉयल को ऑप हो सो.
प्लॉट नं. २५, सेक्टर ७. कामोठे,
नवी मुंबई – ४१०२०९.
मो.क्र. ९००४०८७८७३


# साळाव पुलावर बंदी असतानाही वाहनांची घुसखोरी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी रायगड यांचे आदेशाने साळाव पुलावरून फक्त पाच टन वाहतुकीचा आदेश असताना देखील काही मालवाहतुक वाहने बेशिस्तीने घुसखोरी करून पुलावरून नेण्याचा पर्यंत करत असल्याचे निदर्शनास येते. या बेधडक वाहने पुलावरून नेणारा मालवाहतुक वाहनांची घुसखोरी पोलिसाची सुध्दा डोकेदुखी ठरत आहे.



अति अवजड वाहतुकीमुळे पुल क्षतीग्रस्त झाल्यास होणारी दुर्घटना टाळण्याच्या दृष्टीने तसेच रेवदंडा–साळाव पुलाचे दुरूस्तीचे काम सुरू करावयाचे असल्याने पुढील दोन महिन्याकरीता रेवदंडा–साळाव पुलावरून ५ टनावरील वाहतुक बंद करण्याचा आदेश जिल्हाधिकारी डॉ.योगेश म्हसे यांनी जारी केला आहे.

अलिबाग सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता जगदीश सुखदेवे यांनी सादर केलेल्या अहवालानूसार जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी अति अवजड वाहतुकीमुळे पुल क्षतीग्रस्त झाल्यास होणारी दुर्घटना टाळण्याच्या दृष्टीने तसेच रेवदंडा–साळाव पुलाचे दुरूस्तीचे काम सुरू करावयाचे असल्याने पुढील दोन महिन्याकरीता रेवदंडा–साळाव पुलावरून ५ टनावरील वाहतुक बंद करण्याचा आदेश जारी केला आहे.

पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी पत्रान्वये अलिबाग ते साळाव दरम्यान होणारी अवजड वाहनाची वाहतुक ही अलिबाग–पोयनाड–वडखळ–नागोठणे–कोलाड–रोहा–तळेखार–साळाव मार्गे अथवा अलिबाग–पेझारी–चेकपोस्ट–नागोठणे–कोलाड–रोहा–तळेखार–साळाव मार्गे तसेच दुसरा पर्यायी मार्ग दुसरा पर्यायी मार्ग अलिबाग–बेलकडे–वावे–सुडकोळी–रोहा–तळेखार–साळाव मार्गे व मुरूड अलिबाग दरम्यान होणारी अवजड वाहतुक ही मुरूड–साळाव–तळेखार–चणेरा–कोलाड–नागोठणे–वडखळ–पोयनाड–अलिबाग–अथवा मुरूड–साळाव–तळेखार–रोहा–कोलाड–ागोठणे पेझारी चेकपोस्ट–अलिबाग तसेच दुसरा मार्ग मुरूड–साळाव–तळेखार–रोहा–सुडकोळी–वावे–बेलकडे–अलिबाग या पर्यायी मार्गाचा वापर करू शकतात, असे कळविले आहे.

याबाबत सर्व वाहन चालक, ग्रामस्थ व प्रवासीवर्ग यांनी नोंद घ्यावी असे जिल्हा प्रशासनाचे वतीने कळविण्यात आले आहे तरीही अनेक मालवाहतुक वाहने साळाव पुलावरून बेशिस्तीने घुसखोरी करून वाहने रेवदंडा कडून साळाव – मुरूड बाजूकडे नेण्याचा प्रयत्न करताना निदर्शनास येतात. अचानक रेवदंडा बाजूकडून घुसलेल्या वाहनास पुलावर काम करणारे कर्मचारी वाहन चालकांस वाहन पुलावरून नेण्यास मज्ञाव करतात, व पुनस्यः माघारी पाठवित आहेत.

यावेळी मात्र पोलिसांना सुध्दा मोठी डोकेदुखी ठरते. शासनाचा आदेश असताना बिनधोकपणे साळाव पुलावरून मालवाहतुक वाहने नेणार्या वाहन चालकाचे विरोधात कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली जात आहे.


## कुळगांव बदलापूर नगरपरिषद

जा.क्र. : कुबनप/दिव्यांग पुर्नवसन विभाग/–०१/२०२३–२४ दिनांक : ०६/०४/२०२३

### जाहीर ई–निविदा सूचना क्र. ०१

कुळगांव बदलापूर नगरपरिषद, जिल्हा ठाणे, खालील कामाकरिता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत संस्था / पुरवठादार यांजकडून दरपत्रक मागविणेत येत आहे. **''कुळगाव बदलापुर नगरपरिषद दिव्यांग सर्वेक्षणात आढळुन आलेल्या गतिमंद / मतिमंद दिव्यांगाना थेरपी करिता तात्पुरते दिव्यांग पुर्नवसन सुविधा देणे बाबत.''** बाबतची निविदा https:/mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून याच संकेत स्थळावर ई–निविदा फॉर्म फी, इसारा रक्कम व ई–निविदा Online सादर करण्याचे बंधनकारक आहे. प्राप्त निविदापैंकी कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा अथवा कारणाशिवाय सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांनी राखुन ठेवला आहे.

**सही/–**
**(योगेश गोडसे)**
**मुख्याधिकारी**
**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**



## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ज.व्य. विभाग, पनवेल
### ई–निविदा सुचना क्र. १४२ सन २०२२–२३

निगा व दुरुस्ती माथेरान पाणी पुरवठा योजना, ता. कर्जत, जि. रायगड – उल्हास उद्भवावरील सर्व पंपिंग स्टेशनमधील पंपिंग मशिनरी चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे तसेच कुंभे ते माथेरान दरम्यानची उर्ध्ववाहीनी संरक्षण करणे या कामाच्या निविदा मजीप्राकडून मागविण्यात येत आहे. कामाची अंदाजित रक्कम रू.१.०४ कोटी आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दि. १०/०४/२०२३ पासून www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

निविदा प्रक्रिया कार्यक्रमाच्या सर्व तारखा www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सुचनेनुसार राहतील.

दिनांक : २९/३/२०२३

**सही/–**
**(व्ही. के. सुर्यवंशी )**
कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
विभाग पनवेल



## जाहीर नोटीस

आपणास सदरहु जाहीर नोटीस देऊन कळविण्यात येते की, आपण पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश यांचे कोर्टात रेग्युलर दिवाणी मुकदमा नंबर १३४/२००९ चा दाखल केलेला आहे व सदरहू दाव्यामध्ये आपणातर्फे काम पाहण्यास मी खाली सही करणार अँड जयंत भालचंद्र आपटे यांना आपण वकालतनामा लिहून व सही करून दिलेला आहे. सदरहु वकालतनामा मे. कोर्टासमोर सदरहु दाव्याचे कामात दाखल केलेला आहे. सदरहु रे.दि.मु.नं. १३४/२००९ हा गेल्या अनेक नेमलेल्या तारखांना अंतिम सुनावणीवर ठेवण्यात आलेला आहे. तथापि आपण गेली ३ ते ४ वर्षे मला वकील म्हणुन या दाव्याचे संदर्भात संपर्कही केलेला नाही. आपल्या कळंबोली ता. पनवेल येथील दिलेल्या पत्यावर रजिस्टर्ड ए.डी.टपालाने मी पाठविलेली नोटीस आपण सदर जागा सोडली (left) असा शेरा मारुन परत आलेली आहे. तसेच आपण मला संपर्कासाठी आपला मोबाईल नंबर ९७०२५०१४५६ हा दिलेला असुन सदरहु नंबरवर फोन करायचा अनेक वेळा प्रयत्न केला असता या फोनची सेवा तात्पुरती खंडीत करण्यात आली आहे (Temporarily Out of Service) असे मोबाईल कंपनीकडुन सांगण्यात येत आहे. त्यामुळे सदरहु दाव्याचे संदर्भात आपणांस संपर्क साधण्याचे सर्व प्रयत्न व सर्व मार्ग निष्फळ ठरलेले आहेत. या दाव्याची पुढील नेमलेली तारीख दिनांक १५ एप्रिल २०२३ असून त्यापुर्वी आपण या दाव्याचे संदर्भात माझेशी संपर्क साधावा. तथापि दिनांक १५ एप्रिल २०२३ पुर्वी आपण माझेशी संपर्क न साधल्यास, आपण मला या दाव्याचे कामात सही करुन दिलेले वकीलपत्र या जाहीर नोटीसीने मी रद्द करीत आहे व दिनांक १५ एप्रिल २०२३ रोजी मे. कोर्टाला तसे सुचित करण्यात येईल म्हणुन दिली जाहीर नोटीस.

पनवेल.
दिनांक :– ०६/०४/२०२३

**सही/–**
**अॅड. जे. बी. आपटे**
**पत्ता :** प्लॅट नं १ इंदू–विणा अपार्टमेंट,
व्हि.के. हायस्कुलच्या पाठीमागे,
पनवेल, ४१० २०६ जि. रायगड, नवी मुंबई
मो. ९४२२३७३४६५, ९०२९८४८९६५

# चाकूचा धाक दाखवून लूट

## सराईत गुन्हेगार मुंब्रा पोलिसाच्या ताब्यात; दोघांचा शोध सुरू

**पनवेल : वार्ताहर**

मुंब्रा बायपास रोडवर रात्रीचे वेळी चालकांना अडवून त्यांना चाकूचा धाक दाखवून लूट करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला मुंब्रा पोलिसांनी अटक केली आहे.

मुंब्रा बायपास रोडवर रात्रीचे वेळी ट्रक, ट्रेलरच्या चालकांना अडवून त्यांना चाकूचा धाक दाखवून त्यांच्याकडील मोबाईल, रोख रक्कम चोरी करणाऱ्या गुन्हेगारांबाबत पोलिसांना माहिती मिळाली होती. पोलीस वाहनातून गस्त केल्यास आरोपी हे पोलीस आल्याचे दुरूनच पाहून पळून जातात. म्हणून मुंब्रा वरिष्ठ पोलीस निरीक्षक निवृत्ती कोल्हटकर यांनी पथक तयार करून त्यांना वाय जंक्शन ते रेतीबंदरदरम्यान साध्या वेशात गस्त घालण्याच्या सूचना केल्या.



त्याप्रमाणे पोलिसांचे पथक गस्त करीत असतांना मुंबादेवी मंदिराचे पायय्याजवळ तीन जण हे ट्रक व कंटेनर अडवून त्यांना चाकूचा धाक दाखवून त्यांना लूटत असल्याचे पालिसांना दिसले.

पोलिसांनी त्यांच्या दिशेने धाव घेताच तिघांपैकी दोघे डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या दाट लोकवस्तीमध्ये पळून गेले. त्यापैकी एक आरोपी नादिर मोहंमद तारीक सिद्धीकी (वय २५, रा. दत्तवाडी, मुंब्रा) याचा पाठलाग करीत असताना त्याने चॉपर पोलिसांवर उगारून हल्ला करण्याचा प्रयत्न केला, मात्र पथकाने शिताफीने त्यास ताब्यात घेतले. त्याला पकडतांना झालेल्या झटापटीत पोलीस शिपाई कृष्णा आव्हाड व अब्दुल रौफ खान जखमी झाले.

आरोपी माहिती देत नव्हता. अखेर पोलिसी खाक्या दाखविल्यानंतर त्याने त्याचे पळून गेलेले साथीदार करण विजय तेलकर (रा. दत्तवाडी, मुंब्रा) आणि बाबु यांच्यासोबत मिळून ट्रक किंवा कंटेनर चालकांना लुटल्याची कबुली दिली.

## घणसोलीतील उद्यान व जॉगिंग ट्रॅकची दूरवस्था

### भाजपकडून आंदोलनाचा पालिकेला इशारा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई शहरातील घणसोली विभागातील उद्यान व जॉगिंग ट्रकशेजारी लागवड केलेल्या झाडांची देखभाल केली जात नसल्याने त्यांची दूरवस्था झाली आहे. त्यामुळे लवकरात लवकर उद्यानाची डागडुजी करावी व झाडांच्या संवर्धनासाठी योग्य ती उपाययोजना त्वरीत करावी अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा भाजपचे नवी मुंबई जिल्हा सरचिटणीस कृष्णा पाटील यांनी उद्यान विभागाचे उपायुक्तांना दिला आहे.



उद्यानात लागवड केलेल्या झाडांना वेळेवर पाणी घातले जात नाही. घणसोली विभागात उद्यान अधिकाऱ्याची नेमणूक कशासाठी केली आहे काय? असा प्रश्नही जिल्हा सरचिटणीस कृष्णा पाटील यांनी केला आहे. यासोबतच घणसोली विभागातील नाल्याच्या शेजारी अमृत योजनेंतर्गत जॉगिंग ट्रक निर्माण करण्यात आला आहे. जॉगिंग ट्रकच्या दोन्ही बाजूला झाडांची लागवड करण्यात आली आहे. योग्य ती देखभाल घेतली जात नसल्याने, झाडे सुकून, मुळासकट उफाळून पडली आहेत. त्या झाडाचा पालापाचोळा सर्वत्र पसरलेला अवस्थेंत आहे, तसेच वेळेवर झाडांना पाणी दिले जात नसल्याने झाडे सुकली आहेत. अधिकाऱ्यांनी तत्काळ उद्यान व जॉगिंग ट्रकची दुरूस्ती करावी अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा कृष्णा पाटील यांनी उद्यान विभागाचे उपायुक्त नितीन नार्वेकर यांना पत्राद्वारे दिला आहे.

# हनुमान जन्मोत्सव उत्साहात साजरा





पनवेल : बामणडोंगरी ग्रामस्थ मंडळातर्फे हनुमान जन्मोत्सवानिमित्त आयोजित पालखी सोहळ्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत दर्शन घेतले. या वेळी त्यांचे ग्रामस्थ मंडळातर्फे स्वागत करण्यात आले. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, भाजप उलवे नोड १ सरचिटणीस अंकुश ठाकूर, दीपक गोंधळी, नामदेव ठाकूर, सुहास गोंधळी, गाव अध्यक्ष नंदकुमार ठाकूर, नाना गडकरी, ग्रामपंचायत सदस्य गीता ठाकूर, योगिता नाईक, सदस्य वितेश म्हात्रे, प्रकाश ठाकूर, अरुण नाईक, प्रितम नाईक, माजी जि. प. सदस्य रवींद्र पाटील, अरुण नाईक, रवी नाईक, अश्विन नाईक, चंद्रकात म्हात्रे, प्रकाश म्हात्रे आदींसह इतर सदस्य, कार्यकर्ते उपस्थित होते.

**पनवेल : वार्ताहर**

दरवर्षीप्रमाणे यंदाही शहराजवळील शासकीय विश्रामगृहाशेजारी असलेल्या श्री बालाजी व पंचमुखी मारुती देवस्थान ट्रस्टतर्फे श्री हनुमान जन्मोत्सव धार्मिक व विविध सामाजिक कार्यक्रमांद्वारे साजरा झाला.

यानिमित्ताने गुरुवारी पहाटेपासूनच विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पंचक्रोशीतील भक्तांनी पहाटेपासूनच लांब रांगा लावत या श्री हनुमान जन्मोत्सव सोहळ्यात सहभाग घेतला. अनेकांनी आपले नवस फेडले तर कित्येकांनी नवस केले. हे देवस्थान नवसाला पावणारे असल्याने अनेक भाविकांनी दर्शनासाठी रीघ लावली होती. यानिमित्ताने होमवहनसह विविध धार्मिक कार्यक्रम झाले. उपस्थित भाविकांसाठी दरवर्षीप्रमाणे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यंदाचे हे महाप्रसादाचे २०वे वर्ष असल्याची माहिती ट्रस्टच्या वतीने देण्यात आली, तसेच सायंकाळी मुख्य देवस्थानापासून रथयात्रा शहरातुन काढण्यात येते व त्याची सांगता पुन्हा पंचमुखी मारुती मंदिरात करण्यात येते, अशी माहिती मुख्य ट्रस्टी अशोक गिल्डा व सचिव जगदीश लाहोटी यांनी दिली आहे.























पनवेल : हनुमान जन्मोत्सव गुरुवारी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी विविध पोदी, खारघर, मुर्बी गाव, रोडपाली, आसूडगाव, भिंगारी या ठिकाणी आयोजित कार्यक्रमांना भेट देत दर्शन घेतले. या वेळी आयोजकांच्या वतीने परेश ठाकूर यांचे स्वागत करण्यात आले. दर्शनावेळी माजी नगरसेवक तेजस कांडपिळे, प्रवीण पाटील, अभिमन्यू पाटील, निलेश बाविस्कर, एकनाथ गायकवाड तसेच रुपेश परदेशी, अमर ठाकूर, वासूदेव पाटील, दशरथ म्हात्रे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. (छाया : अक्षय शार्दुल)





पनवेल : हनुमान जन्मोत्सवानिमित्त भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी कोळखे, शिवणसई, आसूडगाव, तक्का येथील मंदिरांत जाऊन मारुतीरायाचे दर्शन घेतले. या वेळी भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, ओबीसी मोर्चा जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, भाविक उपस्थित होते. आयोजकांच्या वतीने मान्यवरांचे स्वागत व सन्मान करण्यात आला.



पनवेल : महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी शहरातील उरण नाका परिसरातील मारूती मंदिरात दर्शन घेतले. या वेळी अरुणा पाटील, कविता पाटील, हरिश्चंद्र भगत, दत्ता पाटील, गजानन भगत, अनिल गोवारी, मदन कोळी, मधुकर भगत, तुकाराम भोईर, दीपक भगत आदी उपस्थित होते.

**उरण : वार्ताहर**

श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा उरणमध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शहरातील मोरा कोळीवाडा, हनुमान कोळीवाडा, भवरा, स्वामी विवेकानंद चौक, गणपतील चौक आदी ठिकाणी धार्मिक कार्यक्रम झाले.

श्री हनुमान जन्मोत्सव सामाजिक मंडळाच्या वतीने गणपती चौक येथील श्री हनुमान मंदिर येथे गुरुवारी (दि. ६) श्री हनुमान



जन्मोत्सव सोहळा साजरा झाला. त्यानिमित्ताने कीर्तन, भजन, महाआरतीसह तीर्थप्रसाद व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. पहाटे ४ वाजता महापूजा, कीर्तन, सकाळी ८ ते १२पर्यंत भजन, दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत महाप्रसाद, सायंकाळी ४ ते ७पर्यंत भजन झाले. रात्री ९ वाजता पालखी मिरवणूक काढण्यात आली.

या वेळी अध्यक्ष विपुल पारेख, उपाध्यक्ष भालचंद्र म्हात्रे, सचिव रोहित पाटील, खजिनदार मधुकर नाईक, सहसचिव रेखा पाटील, सल्लागार जगदीश भोईर, सहखजिनदार मनोज म्हात्रे, व्यवस्थापक नितीन पाटील, रघुनाथ हातनोलकर आदींचे सहकार्य लाभले.

# महादेवी मातेच्या उत्सवाला अलोट गर्दी

## ■ भातसई येथील मंदिर परिसरात जयघोष ; हजारो नयनांनी टिपला गळाचा धार्मिक सोहळा

**रोहे : प्रतिनिधी**

सायंकाळी सुर्य मावळतीला हजारो भक्तांचे गळ या धार्मिक कार्यक्रमाकडे लक्ष लागले होते. आबालवृद्धासह ग्रामस्थ व हजारो भाविकांचे नजरा गळ लागण्याच्या ठिकाणी म्हणजे स्टेजकडे, उत्सुकता शिगेला पोहचली. अंगात संचारलेले भगत चिंतामणी खरीवले लाटेवर आरूढ झाले. हर हर महादेवाचा गजर झाला. मुख्य गळ लावलेल्या लक्ष्मण पवार या भाविकाला अधांतरीत दोरखंड लाटेला बांधलेल्या स्थितीत अधांरीत फिरविण्यात आले. हा क्षण हजारो नयनांनी भक्तीमय वातावरणात टिपला. महादेवी मातेचा जयघोष यावेळी करण्यात आले.

यावेळी मुख्य वरचा गळ लक्ष्मण पवार, त्यानंतर आत्माराम ताडकर, हनुमंत दाभाडे, विलास ठमके, संजय शिंदे, भगवान शेळके या भाविकांना गळ लावण्यात आले होते.

आदल्या दिवशी पालखी उत्सव झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी मंदिर परिसरात यात्रा भरली होती. यात्रेचे



स्वरुप प्रप्त असताना सायंकाळी निडी, पाला वरोडा, लक्ष्मीनगर, झोंळाबेसह मेढा व भातसई पंचक्रोशीतील महादेवाच्या काठ्या ४ वाजल्यापासून मंदीराकडे येत होत्या. पालखी मंदिरात आणण्यात आली. सायंकाळी ५ वाजल्यापासूनच मंदिरात धार्मिक विधी ला सुरुवात झाली. आरती नंतर गळ टुपणे या कार्यक्रमास खालुबाजा वाद्य वृंदावर सुरु झाली. गळ टोचल्यानंतर हर हर महादेव गजर करीत २० फुटी स्टेज असलेल्या ठिकाणी गळ टोचलेले भाविक आले. मुख्य भाविकासह सहा भाविक लाटासह २५ फुटी असलेल्या ठिकाणी मुख्य गळ टोचलेल्या भाविकांना आणण्यात आले.

### ■ घरासमोरील रांगोळीने परिसर सजला

*रोहा तालुक्यातील भातसई येथील महादेवीमातेची आदल्या दिवशी भातसई कोपरा, लक्ष्मीनगर, झोळंबे या गावातून पालखी मिरवणूक विविध वाद्य वृंदावर काढण्यात आली. नागरिकांनी आपल्या घराची रंगरंगोटी केली होती. विविध रंगाचे पताके, विद्युत रोषणाई प्रत्येकाने आपल्या घरासमोर केले होते. महिलांनी आपला दारासमोर सुंदर अशी रांगोळी काढली होती. पालखी आपला दारासमोर आल्यानंतर प्रत्येकाने दर्शन घेतले. हा संपूर्ण पालखी सोहळा मोठ्या उत्साहात मंगळवारी पार पडला आहे.*

सायंकाळी ६ सुमारास मुख्य गळाच्या धार्मिक कार्यक्रमाला सुरुवात झाली. ६.१२च्या सुमारास अंगात संचारलेले भगत चिंतामणी खरीवले लाटेवर आरूढ झाले. या ठिकाणी लाटेला अंधारीत मुख्य वरचा गळ असलेला भाविक लक्ष्मण पवार यांना दोरखंडच्या सहाय्याने अधांतरीत बांधण्यात आले. त्यानंतर हर हर महादेवाचा गजर होताच अंधारीत असलेल्या भाविकांनी फिरविण्यात आले आणि हजारो नेत्रांनी हा क्षण टिपला.

बुधवारी भातसई मुख्ययात्रा निमित्ताने मोठ्या प्रमाणात विविध खेळणी, बांगड्या,कलिंगड,मिठाईचे दुकाने, थंडपेय आदीसह अन्य दुकाने थाटली होती या सर्वांचा लहान मुलांसह वयोवृद्धानी आनंद लुटला. रायगड जिल्ह्यातील सर्वात मोठी यात्रा म्हणून या यात्रेस ओळखले जाते. या सोहळ्यास भातसई, पंचक्रोशी,रोहा, मुंबई, पुणे या प्रमुख शहरासह महाराष्ट्रातील व रायगड जिल्ह्यातील कानाकोपऱ्यातून मोठ्या संख्येने भक्तगण उपस्थित होते. मोठ्या उत्साहाच्या वातावरणात भातसई यात्रा साजरी करण्यात आली असून हा उत्सव यशस्वी करण्यासाठी भातसई ग्रामस्थासह पंचक्रोशीतील ग्रामस्थ व भाविकांनी परिश्रम घेतले.

# आदर्श नागरी पतसंस्थेने ओलांडला ५०० कोटींचा पल्ला

**अलिबाग : प्रतिनिधी**



आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेने २०२२-२०२३ अर्थिक वर्षात एकत्रीत व्यवसायाचा ५०० कोटी रूपयांचा पल्ला ओलांडला आहे. आदर्श पतसंस्थेने ५०८ कोटी १० लाख रुपयांचा एकत्रित व्यवसाय केला आहे. २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात ४ कोटी ८१ लाख रुपयांचा निव्वळ नफा मिळवला आहे. ग्रॉस एनपीए ०.८८ टक्के असून नेट एनपीए शून्य टक्के आहे, अशी माहिती आदर्श पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी दिली.

आदर्श नागरी पतसंस्थेच्या ठेवी ३०२ कोटी ९१लाख रुपये असून २०५ कोटी १९ लाख रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले आहे.संस्थेचा निव्वळ नफा ४ कोटी ८१ लाख रुपये झाला आहे. ११७ कोटी ७४ लाख रुपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे. संस्थेचे भागभांडवल १५ कोटी २ लाख रुपये आहे. मागील वर्षी आदर्शचा एकत्रीत व्यवसाय ४२२ कोटी ९६ लाख होता. नफा ३ कोटी ६९ लाख रुपये झाला होता.

संस्थेने मोबाईल अँप, क्यू आर कोड यासारख्या सुविधा ग्राहकांना चालू केल्या आहेत, मोबाईल अँप मधून फंड ट्रान्सफर, आर्टिजीएस, नेफ्ट, आय एम पी एस , मोबाईल रिचार्ज, डिशटीव्ही रिचार्जे, वीज बिल भरणा सारख्या सुविधा उपलब्ध आहेत. आदर्शच्या पेण व उरणसह शाखा १६ आहेत. रायगड, मुंबई, ठाणे, पुणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग सहा जिल्ह्यांचे कार्यक्षेत्र आहे, अशी महिती पाटील यांनी दिली. आदर्शचे सभासद ठेवीदार, ग्राहक, हितचिंतक,संचालक मंडळातील सहकारी, सल्लागार, आर्थिक सल्लागार श्री. वाणी सर, कर्मचारी, पिग्मी प्रतिनिधी, कायदेविषयक सल्लागार, यांच्यामुळेच आम्ही हा पल्ला गाठू शकलो, असे आदर्श पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजित पाटील यांनी सांगितले.

# माणगावात मुस्लिम बांधवांसाठी उद्या इफ्तार पार्टी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावात लोकनेते माजी आमदार अशोकदादा साबळे स्मृती प्रतिष्ठान व द. ग. तटकरे महाविद्यालय माणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने पवित्र रमजान रोजाच्या निमित्ताने मुस्लिम बांधवांसाठी शनिवारी (दि.८) सायंकाळी द. ग. तटकरे महाविद्यालय माणगाव याठिकाणी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले आहे.

सध्या मुस्लिम धर्मियांचा पवित्र रमजान महिना सुरु असून या महिन्यात मुस्लिम बांधव पहाटे लवकर उठून रोजा(उपवास) धरतात. सायंकाळी मगरीबच्या बांगीबरोबर हा रोजा सोडला जातो त्यास इफ्तारी असे म्हणतात. या पवित्र रमजान महिन्यात माणगाव तालुक्यातील मुस्लिम बांधवाना इफ्तार पार्टीच्या निमित्ताने एकत्र आणण्याचे काम माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव अशोक साबळे व सहकारी यांनी अशोकदादा साबळे स्मृती प्रतिष्ठान, द.ग.तटकरे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने केले आहे.

या इफ्तार पार्टीसाठी माणगाव तालुक्यातील जास्तीत जास्त मुस्लिम बांधव व तालुक्यातील मान्यवर व्यक्तींनी सहभागी होऊन या कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन आयोजक अशोकदादा साबळे स्मृती प्रतिष्ठान व द.ग.तटकरे महाविद्यालय माणगाव यांनी केले आहे.

# माणगावात चोरी; १९ हजार ३०० रुपयांचा माल लंपास

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावात चेतक इंटरप्रायझेसमधील स्टील वॉर्डमध्ये चोरी होऊन अज्ञात चोरटे १९ हजार ३०० रुपयांचा माल घेऊन पसार झाले आहेत. ही घटना मंगळवारी (दि.४) रात्री ८ वाजता ते बुधवार ५ एप्रिल रोजी सकाळच्या दरम्यान (नक्की वेळ माहिती नाही.) घडली. या बाबतची फिर्याद अनुज नानाजीचे एकूण १२ नग सुमारे ५ फूट लांबीचे वजन सुमारे २५० किलो प्रत्येकी नग सुमारे किंमत १००० रुपये, ७ हजार ३०० रुपये किमतीचे टीएमटी स्टील (२५ एमएम) चे एकूण २० नग सुमारे ५ फूट लांबीचे वजन सुमारे ११५ किलो प्रत्येकी किंमत ६३ रुपये प्रति किलो असा एकूण १९ हजार ३०० रुपयाचा माल चोरून पसार झाले आहेत. घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा रजि.नं.९२/२०२३ भादंवि संहिता कलम ३७९ प्रमाणे दाखल करण्यात आली आहे.

# अलिबागमध्ये रास्त भाव दुकानाला आग

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग शहरातील रास्त भाव दुकानाला गुरुवारी दुपारी अचानक आग लागली. दुकानातील ऱ़ॉकेल साठ्यामुळे आगीचा भडका मोठ्या प्रमाणात उडाला होता. अग्निशामक दलाने वेळीच आगीवर नियंत्रण मिळवल्याने मोठी दुर्घटना टळली.

दुपारी पावणे तीनच्या सुमारास शॉर्टसर्कीटमुळे आग लागली. दुकानात रॉकेलचा साठा असल्याने आगीचा भडका उडाला. अलिबाग नगरपालिका आणि आरसीएफच्या अग्निशमन दलांना तातडीने पाचारण करण्यात आले. आसपासचा परीसर तातडीने खाली करण्यात आला. आगीचे ठिकाण पेंट्रोल पंपाच्या शेजारी असल्याने पंपाचा परिसर तातडीने रिकामा करण्यात आला. सुरक्षेच्या दृष्टीने ठिकरूळ नाका परिसरातील वाहतूक थांबविण्यात आली.

नगरपालिकेच्या आणि आरसीएफच्या अग्निशमन दलाने आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र या दुर्घटनेत राहूल जगे यांचे रास्त भाव दुकान जळून खाक झाले. घटनेची माहिती मिळताच मुख्याधिकारी अंगाई साळुंखे, माजी नगराध्यक्ष प्रशांत ठाकूर, हर्षल पाटील, कैलास जगे, प्रविण ठाकूर, संजना कीर घटना स्थळी दाखल झाले होते. त्यांनी नागरिकांना दूर राहण्याचे तसेच आसपासचा परिसर रिकामा करण्याच्या सूचना दिल्या.

# माणगाव-दिघी मार्गावर ट्रकच्या धडकेत एक गंभीर

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव-दिघी राज्य मार्गावर माणगावपासून ६ किमी अंतरावर असणाऱ्या बोर्लेच्या हद्दीत वेगाने येणाऱ्या ट्रकची धडक लागल्याने झालेल्या अपघातात एक गंभीर जखमी झाला. अपघाताचा गुन्हा बुधवारी (दि.५) दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास घडला. या अपघाताची फिर्याद कल्पेश दिलीप जेधे (वय-३२) मूळ रा. बोर्ले ता. माणगाव सध्या रा. डोंबिवली वेस्ट यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

या अपघाताबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती, घटनेतील आरोपी शाहरुख रज्जाक शेख (वय-२७) रा. सातेफल जि. जालना हे त्यांच्या ताब्यातील ट्रक क्र. एम.एच.०६बी.डी.६४१५ ही गाडी दिघी ते माणगाव राज्य महामार्गाने श्रीवर्धन बाजूकडून माणगाव बाजूकडे भरधाव वेगात चालवीत घेऊन येत असताना त्यांची गाडी माणगाव जवळ आली असता बोर्ले गावाकडील श्री भैरी बोजारई देवीची पालखी देवीच्या मंदिराकडे वळत असताना आरोपी ट्रक चालक याच्या ताब्यातील ट्रकची समोरून चाललेल्या देवीचे पालखीच्या सोबत असलेल्या फिर्यादी यांचा चुलत भाऊ सुनील बाबुराव जेधे (वय-४३) रा. बोर्ले ता. माणगाव यांना धडक बसून या अपघातात त्यांना गंभीर व किरकोळ स्वरूपाच्या दुखापती झाल्या.

या अपघाताच्या गुन्ह्याची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात कॉ. गु. रजि. नं. ९१/२०२३ भादंवि संहिता कलम २७९, ३३७,३३८, मोटार वाहन कायदा कलम अधि नियम १८४ प्रमाणे दाखल करण्यात आली आहे. या अपघाताच्या गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री. भोजकर हे करीत आहेत.

# पेणमध्ये ठिकठिकाणी हनुमान जन्मोत्सव साजरा

**पेण : प्रतिनिधी**

हनुमान जन्मोत्सवानिमित्त पेणमधील ठिकठिकाणच्या मंदिरात विविधधार्मिक कार्यक्रम व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. आनंदनगर रामवाडी, पेण येथील जैन बंधूच्या श्री हनुमान मंदिरात जयंती उत्सव मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात साजरा करण्यात आला.

यानिमित्त पूजापाठ, हनुमान जयंतीचे किर्तन, आरती, भजन असे विविध कार्यक्रम संपन्न झाले. तसेच यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या महाप्रसादाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला. पेण येथील व्यापारी विजय



जैन, रणजित जैन, चंद्रविलास जैन, हेमेंद्र जैन या जैन बंधूंनी १४ वर्षांपूर्वी आनंदनगर रामवाडी येथे हनुमंताचे मंदिर बांधले आहे.

या मंदिरात दरवर्षी हनुमान जयंती साजरी करण्यात येते. यंदा १४ व्या वर्षी देखील या मंदिरात हनुमान जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी अनेक मान्यवरांसह शहरातील नागरिकांनी उपस्थित राहून दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला. तसेच पेण शहरातील हनुमान चौक कोळीवाडा येथील हनुमान मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. कोळीवाडा पंच कमिटीचे अध्यक्ष गणेश आवास्कर, उपाध्यक्ष देविचंद कोळी, सदस्य संतोष थळे, दर्शन कोळी, कृष्णा साकोस्कर, देविचंद मोतीराम कोळी, संगीता वास्कर, मंगेश आवास्कर, महेश आवास्कर, अनिता कोळी, आदींसह कमिटीचे सदस्यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. गेली ६४ वर्षे हनुमान जयंती सोहोळा कोळीवाड्यात साजरा करण्यात येत असून यावेळी सायंकाळी पालखी सोहोळा,रात्रौ भजन, कीर्तन कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले असल्याची माहिती यावेळी आयोजकांच्या वतीने देण्यात आली.

तसेच कासारआळी येथील हनुमान टिपेच्या मारुती मंदिरात व शिवाजी पथ येथील श्री हनुमान मंदिरात हनुमान जयंती निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमही झाले. कुंभारआळी येथील मंदिरातही महाप्रसादाचा शेकडो भाविकांनी लाभ घेतला. मंदिरात दर्शनासाठी सकाळपासूनच भाविकांची गर्दी होती. हनुमान जयंती निमित्त मंदिर परिसर विद्युत रोषणाईने सुशोभित करण्यात आला होता. या निमित्त रात्री पालखी प्रदक्षिणा सोहळा संपन्न झाला.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय विभागामार्फत उपक्रमांचा जागर

अलिबाग : प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त १ एप्रिल ते १ मे २०२३ या कालावधीत सामाजिक समता पर्व अभियानांतर्गत विभागाच्या विविध योजनांच्या अनुषंगाने थेट जनतेपर्यंत संवाद साधण्याच्या अनुषंगाने सामाजिक न्याय विभागामार्फत विविध उपक्रमांचा जागर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांमध्ये नागरिकांनी, विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सुनील जाधव यांनी केले आहे.



या विविध उपक्रमांच्या जागर कार्यक्रमामध्ये अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या व मातंग समाजाच्या वस्त्यांना भेटी देणे, त्यांना सामाजिक न्याय विभागाच्या योजनांची माहिती देणे, रमाई आवास योजनेतून मातंग समाजासाठी घरकुले मंजूर करणे, सहाय्यक आयुक्त, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जाती पडताळणी समिती कार्यालये यांनी शिक्षण विभागाशी समन्वय करुन मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळेतून जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राचे वाटप करणे, जिल्ह्यातील सर्व महाविद्यालय, आश्रमशाळा, निवासी शाळा, शासकीय वसतिगृहामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर आधारित वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, पथनाट्य स्पर्धांचे आयोजन करणे, जिल्ह्यामध्ये ग्रामीण व शहरी भागात पथनाट्य व लघुनाटिकेद्वारे जनतेला सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांबाबत प्रबोधर करणे, अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्याविषयी कार्यशाळा आयोजित करणे, कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान सबळीकरण योजनेच्या लाभार्थ्यांची कार्यशाळा घेणे, जिल्हा व तालुका स्तरावर महात्मा फुले जयंती साजरी करणे, वक्त्यांना आमंत्रित करून व्याख्यानपर कार्यक्रमाचे नियोजन करणे, ग्रामीण व शहरी भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्त्यांमध्ये स्वच्छता करणे, संविधान जनजागृती कार्यक्रम आयोजित करणे, सामाजिक न्याय विभागांतर्गत सर्व शासकीय कार्यालय, महाविद्यालय, निवासी शाळा, आश्रमशाळा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन कार्यक्रम, व्याख्यान, चर्चासत्र इतर साजरे करणे, जिल्ह्यात जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या सहकार्याने जिल्ह्यातील सर्व महाविद्यालय, आश्रमशाळा, शासकीय वसतिगृह, निवासी शाळा येथे रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करणे, समान संधी केंद्रामार्फत नशामुक्त भारत अभियानांतर्गत व्यसनमुक्त व शिष्यवृत्तीच्या योजनांच्या माहिती संदर्भात विशेष अभियान राबविणे, ज्येष्ठ नागरिक, तृतीयपंथी, सफाई कर्मचारी यांच्याकरिता आरोग्य शिबिर, जनजागृती शिबिर, मेळावा व कार्यशाळा आयोजित करणे, समान संधी केंद्रांतर्गत महात्मा फुले जयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, महाराष्ट्र दिन साजरा करणे, असे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सुनील जाधव यांनी कळविले आहे.

# पेणच्या गणेशमूर्तिकारांनी घेतली आमदार महेंद्र दळवी यांची भेट



**पेण : प्रतिनिधी**

पेणच्या श्री गणेश मुर्तीकारकांनी आपल्या विविध मागण्या तसेच पीओपी वरील बंदी कायमची उठविण्याची मुख्य मागणी घेऊन उपजिल्हाप्रमुख रुपेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली आमदार महेंद्र दळवी यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली.

गेल्या काही वर्षांपासून पेणच्या गणेश मुर्तीकारांना विविध अडचणीचा सामना करावा लागत आहे. पेण शहरासह तालुक्यातील शेकडो तरुण या व्यवसायावर आपला उदरनिर्वाह करत आहेत. मात्र पीओपी बंदीमुळे भविष्यकाळात या व्यवसायावर गदा येऊ शकते. त्यामुळे गणेश मुर्तीकार मालकांसह कामगार चिंतीत झाला आहे. त्यामुळे मूर्तिकारांनी या संदर्भात उपजिल्हाप्रमुख रुपेश पाटील नेतृत्त्वाखाली राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विश्वासू आमदार महेंद्र दळवी यांची त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली. यावेळी गणपती कारखानदार ऊन, वारा, पाऊस याची तमा न बाळगता, बँकांच्या कर्जाचे ओझे अशा अनेक समस्यांना तोंड देत खडत - ररखडत आपला व्यवसाय सांभाळत असून पीओपी बंदीमुळे आगामी काळात या व्यवसायावर गदा येण्याची चिन्हे दिसत आहेत. या पारंपरिक व्यवसायाला कुठेतरी न्याय मिळावा यासाठी शासन दरबारी आमचे गाऱ्हाणे मांडावे या मागणीचे निवेदन यावेळी गणपती कारखानदार व कामगारांनी आमदार महेंद्र दळवी यांना दिले.

यावेळी झालेल्या चर्चादरम्यान आमदार महेंद्र दळवी, जिल्हा संपर्कप्रमुख प्रकाश देसाई, जिल्हाप्रमुख राजा केणी उपस्थित होते. लवकरच मुर्तीकारांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, खजिनदार यांच्यासह इतर शिष्टमंडळासोबत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घडवून आणणार असल्याचे आमदार महेंद्र दळवी यांनी बोलताना सांगितले.

यावेळी उपजिल्हा प्रमुख रुपेश पाटील, श्री गणेश मूर्तिकार संघटनेचे हमरापूर विभाग अध्यक्ष किरण दाभाडे, हमरापूर ग्रामपंचायतीचे सरपंच राकेश दाभाडे, कळवे ग्रामपंचायतीचे सरपंच सतिश पाटील, माजी अध्यक्ष कुणाल पाटील, निकिता पाटील, राजन पाटील, संजय पाटील, विनोद नाईक सचिन गतिमडे आदींसह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पंजाबचा राजस्थानवर रोमहर्षक विजय

## एलिसचे चार बळी



**गुवाहाटी : वृत्तसंस्था**

पंजाब किंग्जने राजस्थान रॉयल्सचा पराभव करून आयपीएलमध्ये सलग दुसरा विजय मिळवला. राजस्थानने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी स्वीकारल्याने पंजाबने प्रथम फलंदाजी करताना १९७ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात राजस्थानचा संघ केवळ १९२ धावा करू शकला. त्यामुळे त्यांना पाच धावांनी विजय मिळता आला. या सामन्यात पंजाबकडून गोलंदाजीत नॅथन एलिसने सर्वाधिक चार बळी घेतले.

या सामन्यात १९८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना रविचंद्रन अश्विनला राजस्थान रॉयल्सच्या सलामीला यशस्वी जैस्वालसह मैदानात पाठवण्यात आले. यशस्वीने आपल्या डावातील पहिल्या चेंडूवर षटकार ठोकला, मात्र त्यानंतर आठ चेंडूंत ११ धावा काढून तो अर्शदीपचा बळी ठरला. यानंतर फलंदाजीला आलेल्या जोस बटलरने अश्विनसोबत वेगाने धावा करण्यास सुरुवात केली. राजस्थानला २६ धावांच्या स्कोअरवर दुसरा धक्का अश्विनच्या रूपाने बसला, जो खाते न उघडता पॅव्हेलियनमध्ये परतला. यानंतर बटलर आणि कर्णधार संजू सॅमसनमध्ये तिसऱ्या विकेटसाठी १४ चेंडूत ३१ धावांची भागीदारी झाली. राजस्थानला ५७ धावांवर तिसरा मोठा धक्का बटलरच्या रूपाने बसला, जो १९च्या वैयक्तिक स्कोअरवर नॅथन एलिसचा बळी ठरला.

कर्णधार संजू सॅमसनने देवदत्त पडिकलसह धावसंख्या पुढे नेली, ज्यामध्ये चौथ्या विकेटसाठी दोघांमध्ये ३४ धावांची भागीदारी पाहायला मिळाली. सॅमसन २५ चेंडूंत ४२ धावांची शानदार खेळी करून पॅव्हेलियनमध्ये परतला. राजस्थान संघाने १२४ धावांपर्यंत आपले सहा महत्त्वाचे गडी गमावले होते.

या सामन्यात शिमरॉन हेटमायरने संघाला विजय मिळवून देण्यासाठी वेगवान धावा करण्याचा प्रयत्न केला, मात्र तोही १८ चेंडूंत ३६ धावांची झटपट खेळी करत पॅव्हेलियनमध्ये परतला. त्यानंतर ध्रुव जुरेल १५ चेंडूंत ३२ धावांवर नाबाद राहिला. अशा प्रकारे राजस्थान संघाला या सामन्यात पाच धावांनी पराभवाला सामोरे जावे लागले. या सामन्यात पंजाबकडून नॅथन एलिसने चार, तर अर्शदीप सिंगने दोन बळी घेतले.

तत्पूर्वी पंजाबकडून कर्णधार शिखर धवन आणि प्रभसिमरन सिंग या जोडीने फलंदाजीत खूप महत्त्वाची भूमिका बजावली. या दोघांमध्ये पहिल्या विकेटसाठी ९० धावांची भागीदारी झाली होती. प्रभसिमरनने ३४ चेंडूंत ६० धावा केल्या. धवनने शेवटपर्यंत फलंदाजी करताना ५६ चेंडूंत नऊ चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने ८६ धावांची उत्कृष्ट खेळी साकारली. पंजाबने २० षटकांत चार गडी गमावून १९७ धावा केल्या. राजस्थानकडून सामन्यात जेसन होल्डर दोन, तर रविचंद्रन अश्विन आणि युजवेंद्र चहल यांना एक बळी मिळविला.

## माजी क्रिकेटपटू सुधीर नाईक यांचे निधन

**मुंबई : प्रतिनिधी**



भारतीय क्रिकेट संघाचे माजी सलामीवीर सुधीर नाईक यांचे बुधवारी (दि. ५) अल्पशा आजाराने मुंबईतील रुग्णालयात निधन झाले. निधन झाले. ते ७८ वर्षांचे होते आणि त्यांच्या पश्चात एक मुलगी आहे. क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर त्यांनी कोचिंगसोबत पीच क्युरेटर म्हणूनही काम केले.

सुधीर नाईक हे मुंबई क्रिकेट विश्वातील अत्यंत प्रतिष्ठित व्यक्ती आणि रणजी ट्रॉफी विजेते कर्णधार होते. त्यांच्या नेतृत्वाखाली संघाने १९७०-७१ हंगामात रणजी विजेतेपद पटकाविले. सुनील गावसकर, अजित वाडेकर, दिलीप सरदेसाई आणि अशोक मांकड यांसारख्या बड्या खेळाडूंशिवाय मुंबईने त्या मोसमात रणजी करंडक जिंकल्यामुळे नाईक यांच्या नेतृत्वाचे खूप कौतुक झाले होते. ते मुंबई निवड समितीचे अध्यक्षही होते. नंतर त्यांनी वानखेडे स्टेडियमचे क्युरेटर म्हणून काम केले.

## रेवदंड्यात आमदार चषक क्रिकेट स्पर्धा

**रेवदंडा : प्रतिनिधी**



(छाया : महेंद्र खैरे)

रेवदंडा हरेश्वर मैदानात यंग स्टार क्रिकेट संघाच्या वतीने ६ ते ९ एप्रिलदरम्यान आमदार महेंद्र दळवी चषक टेनिस बॉल मर्यादित षटकांची क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचा शुभारंभ गुरुवारी (दि. ६) शिवसेना तालुका अध्यक्ष प्रफुल्ल मोरे यांच्या हस्ते झाले.

उद्घाटन समारंभास शिवसेना शहर अध्यक्ष योगेश पिटनाईक, उपाध्यक्ष विजय हाडकर, सेक्रेटरी समीर आठवले, खजिनदार केदार खोत, सदस्य विवेक दांडेकर, मन्सूर तांडेल, शैलेश गोंधळी, चंद्रकांत दांडेकर, सामाजिक कार्यकर्ते राजू चुनेकर, हेमंत गुंडा आदी उपस्थित होते.

या स्पर्धेत प्रथम क्रमांक विजेत्या संघास ५० हजार रुपये, द्वितीय २५ हजार, तृतीय व चतुर्थ क्रमांकास प्रत्येकी १५ हजार रुपये आणि चारही विजेत्यांना चषक देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे उत्कृष्ट फलदांज, उत्कृष्ट गोलदांज, सामनावीर अशी बक्षिसे आहेत.

## बॅडमिंटन स्पर्धेत मंजुनाथ, राजावत विजयी



**ऑरलिन्स (फ्रान्स) : वृत्तसंस्था**

भारताच्या समीर वर्मा आणि सायना नेहवाल या प्रमुख बॅडमिंटनपटूंचे ऑरलिन्स मास्टर्स स्पर्धेतील आव्हान बुधवारी पहिल्याच फेरीत संपुष्टात आले, तर राष्ट्रीय विजेता मिथुन मंजुनाथ आणि प्रियांशू राजावत यांनी विजयी सलामी देत आपल्या मोहिमेस सुरुवात केली.

समीरला पहिल्या फेरीत आर्यलडच्या निहत एन्गुएनकडून १९-२१, २१-१९, २१-१७ असा पराभव पत्करावा लागला. महिला एकेरीत सायना नेहवालसह आकर्षी कश्यपचेही आव्हान संपुष्टात आले. सायनाला पात्रता फेरीतून आलेल्या तुर्कीच्या नेस्लीहान यिजीटकडून १६-२१, १४-२१ अशी, तर आकर्षीला जपानच्या नात्सुकी निडाराकडून ८-२१, २१-१३, ८-२१ अशी हार पत्करावी लागली.

पुरुष एकेरीत राष्ट्रीय विजेत्या मिथुन मंजुनाथने शानदार सलामी दिली. मंजुनाथने डेन्मार्कच्या व्हिक्टर स्वेण्डसेनचा २४-२२, २५-२३ असा पराभव केला. राजावतने भारताच्याच किरण जॉर्जला २१-१८, २१-१३ असे पराभूत केले. मंजुनाथ दुसऱ्या फेरीत तैवानच्या यु जेनशी, तर राजावत अव्वल मानांकित केंटा निशिमोटोशी खेळेल.












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com